श्री

# ऐतिहासिक जुने-लेख.

## पुस्तक २ रें.

चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती

व

यादी-सनदा-पत्रें.

ग्रथित करणार

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.

१९१७

किंमत ८ आणे.

(ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

श्रीमंत रा. रा. खंडेराव बळवंत

ऊर्फ

## धनीसाहेब चिटणीस.

इनामदार बोरगांव, वडगांव इ. इ.

यांस

आदर व प्रेमपूर्वक

हें पुस्तक

त्यांचे परवानगीनें

ग्रथित करणारानें अत्यंत नम्रतापूर्वक अर्पण केलें आहे.

श्री. सो. ग. पं, वाच...
6 APR 1990

Mrs Indirabai Chitre



श्रीमंत रा. रा खंडेराव बळवंत ऊर्फ धनीसाहेब चिटणीस.

17 JAN 1994

@ ९९

बाचनाल

श्री

# प्रस्तावना.

OT ११
८७

इतिहासोत्तमादस्मा ज्जायन्ते कविबुद्धयः ।
पंचेभ्यइव भूतेभ्यो लोकसंविधयस्त्रयः ॥

प्रगतीच्या योगानें सांप्रत आह्मांस जी थोडीबहुत जागृतावस्था प्राप्त झाली आहे, तीमुळें आह्मांस आमच्या प्रतापी पूर्वजांचे स्थितीचें थोडें फार स्मरण होऊन त्यांच्या अलौकिक कृति अवलोकन करण्याची इच्छा होऊं लागली आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. ह्या विषयाची आह्मांमध्यें किती आवड आहे व कोणी किती इतिहासाची साधनें प्रसिद्ध केलीं आहेत याचें दिग्दर्शन आम्हीं १ लें पुस्तकांत केलेंच आहे. अर्थात् त्याची पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.

रा. ब. साने यांनीं "काव्येतिहास संग्रहा" मध्यें व रा ब. पारसनीस यांनीं "मराठ्यांच्या इतिहासाची साधनें" यांतून ज्या बखरी व लेख पत्रे प्रसिद्ध केले, त्या खेरीज इतर मासिकांमध्येंहि बरीच ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झाली आहे. अलीकडे पुणें येथें "भारत इतिहास संशोधक मंडळ" स्थापन झालें असून, त्यानीं महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध करण्याचें कार्य हातीं घेतलें आहे. त्याचप्रमाणें श्रीयुत रा. विनायक लक्ष्मण भावे यांनींहि ठाणें येथें एक संशोधनाची संस्था काढून ते ह्या कार्यास मदत करीत आहेत. हें सर्व आमच्या महाराष्ट्राचें सुदैवच समजलें पाहिजे; परंतु तेवढ्यानेंच महाराष्ट्राच्या इतिहासाची इमारत पुरी होईल, असें समजून स्वस्थ बसणें योग्य होणार नाहीं; कारण इमारत सर्वांगसुंदर करण्यास निरनिराळ्या प्रकारचें कारागीर लागतात. त्यांवाचून ती पुरी होऊं शकणार नाहीं; तर ह्या कामीं प्रत्येकानें शक्य ती मदत सर्व प्रकारें केली पाहिजे हें उघड आहे.

महाराष्ट्राचा इतिहास लिहिणारांस मुख्य आधार **ऐतिहासिक जुने लेख, बखरी**, वगैरे हीं होत. ह्मणून ही माहिती जेवढी प्रसिद्ध होईल तेवढी हवीच आहे. हें निर्विवाद आहे. अशा माहितीच्या आधारेंच महाराष्ट्राचाच नव्हे तर सर्व हिंदुस्थान देशाचा विश्वसनीय असा इतिहास लिहितां येईल व या कार्यास अंशतः तरी मदत करावी, याच हेतूनें व याच दिशेनें प्रस्तुतचा ह्या आमचा यत्न आहे.

दाखल नं ......
6 APR 1960
भोर

हें सांगावयास नकोच. अशी माहिती प्रसिद्ध झाल्यानें व तिच्या सहाय्यानें जो इतिहास लिहिला जाईल, तो पाश्चिमात्य देशांतील इतिहासापेक्षांहि विशेष महत्त्वाचा होईल यांत शंका नाहीं.

ज्यांनीं हिंदुपादशाहीची भव्य इमारत रचण्याकरितां आपल्या राजाची एकनिष्ठ सेवा केली, व आपल्या पराक्रमांनीं व मुत्सद्दिगिरीनें आपलें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें, व कित्येक प्रसंगीं आपले व आपल्या मुलाबाळांचे देहही खर्ची घातले, त्या थोर पुरुषांची सविस्तर माहिती प्रसिद्ध झाल्यावांचून महाराष्ट्राच्या इतिहासाची इमारत केव्हांहि पूर्ण होणार नाहीं.

**श्री शाहू छत्रपति महाराजांच्या** कारकिर्दीच्या अखेरीस व **श्री बाळाजी बाजीराव** पेशवे यांचे कारकिर्दीपासून महाराष्ट्रांतील राजकारणांत बरेच महत्वाचे फेरफार घडून आले. याच सुमारास ज्यांनीं मराठ्यांच्या राज्याच्या इमारतीचा पाया रचण्याकरितां आपले जीवही खर्ची घातले होते, त्यांचे वंशज त्या वेळीं महाराष्ट्र राजकारणांतून आपलें अंग हळुहळू काढून घेऊं लागले, त्या वेळीं त्यांपैकीं कित्येकांवर दैवानें वक्रदृष्टि केल्यामुळें ते सत्ताहीन झाले, व इतिहासाच्या अज्ञानामुळें आह्मांपैकीं पुष्कळांस त्यांची ओळखहि, नाहींशी झाली आहे. तथापि त्यांपैकीं कित्येकाविषयीं माहिती प्रसिद्ध करण्याची सुसंधि आह्मांस मिळाली, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. इतिहाससंशोधकांकडून आज जी माहिती प्रसिद्ध झाली आहे, त्यांत चिटणीस दप्तर फारच थोडें प्रसिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें देशमुख, देशपांडे, पोतनीस, पारासनीस वगैरे घराण्यांची हकीकतहि फारच क्वचित् प्रसिद्ध झालेली आढळतें. मराठेशाहीच्या ऐन उत्कर्षाच्या वेळीं या घराण्यांचा तिच्याशीं अत्यंत निकट संबंध होता करितां या घराण्यांची सविस्तर माहिती प्रसिद्ध झाल्या खेरीज महाराष्ट्राच्या इतिहासाचें खरें रहस्य समजणार नाहीं.

१लें पुस्तकांत नमुद केल्याप्रमाणें आम्हीं '५ पुस्तकें, तयार केलीं होतीं. परंतु तें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर ह्याच प्रसिद्ध चिटणीस घराण्यांतील श्री. रा. रा. **बळवंतराव रघुनाथ चिटणीस**, इनामदार जैतापूर, यांजकडून कांहीं ऐतिहासिक माहिती व पत्रें आमचेकडे आलीं. त्याचप्रमाणें श्री. रा. रा. **रामराव**

**नारायण प्रधान**, विळेकर मु॥ बडोदें यांजकडून विजापूरचे दरबारीं ह्या चिटणीसांचे पूर्वज **श्रीरंगप्रभू** असल्याबद्दलची छोटी बखर व कांहीं अस्सल पत्रें आलीं आहेत ह्याबद्दल आम्हीं ह्या उभयतांचे फारच ऋणी आहोंत. ह्या शिवाय दोन ठिकाणीं बरीच ऐतिहासिक माहिती असल्याचें समजलें, इतकेंच नाहीं तर ती लवकरच आमचेकडे पाठविण्यांत येणार आहे. आमचा हेतु ही माहिती मिळवून संग्रहीं ठेवण्याचा नसून शक्य तितकें त्वरित प्रसिद्ध करून इतिहासज्ञात्यां-पुढें ठेवावयाचा आहे, परंतु हें कार्य लोकाश्रयावर अवलंबून आहे हें उघडच आहे.

१लें पुस्तकासंबंधीं लोकमत कसें होतें हें समजण्याकरितां जे थोडे अभिप्राय मासिक व वर्तमानपत्रें यांतून आले होते ते ह्या पुस्तकांत दिले आहेत. त्याचप्रमाणें हें पुस्तक मान्य करून घेतील अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे.

ह्या पुस्तकांतील बखरीचा वरील बंद न मिळाल्यामुळें १ल्या व २र्‍या पुस्तकांतील अगदीं मधलीच माहिती गेल्यामुळें थोडें विसंगत दिसतें हें खरें, परंतु कांहीं दिवसांनीं पुढील हकीकतहि नामशेष होणार व अखेर कांहींच नाहीं. यापेक्षां जी मिळाली तेवढीच प्रसिद्ध केली आहे.

यादी पत्रावरील नंबर १लें पुस्तकावरून चालू आहेत व पुढेंही हाच क्रम ठेवण्यांत येईल.

ह्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत चिटणवीस घराण्यांतील गृहस्थ श्री. रा. स. **बळवंतराव रघुनाथ चिटणवीस** इनामदार जैतापूर व श्रीयुत रा. रा. **नरहर नारायण देशपांडे** मु, उरवडे यांनीं आमची विनंति मान्य करून वाचून आह्मांस कांहीं शब्द लागलें नव्हते ते दुरुस्त करून पाठविले. श्रीयुत **दामोदर यशवंत दिघे**, फोटोग्राफर (गुरुदास कंपनीचे मालक) यांनीं श्री. रा. रा. धनीसाहेब चिटणवीस यांचा फोटो मोठ्या मेहनतीनें मिळवून दिला ह्याबद्दल आम्हीं ह्या सर्वांचे अत्यंत आभारी आहोंत.

शेवटीं ज्या **दिव्यशक्तीनें आर्य** पूर्वजांच्या इतिहासांचे पुनरुज्जीवन करण्याचा मांगलिक सुयोग आणून दिला, त्यामुळें हें दुसरें पुस्तक प्रसिद्ध झालें. तीस अनन्य भावें शरण जाऊन अंगिकृत कार्यांत यश प्राप्ति देण्याविषयीं करुणा भाकून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

कृष्णाबाई बिल्डींग<br>बेनाम हॉल लेन, गिरगाव मुंबई,<br>ता. २९ माहे मे सन १९१७

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी**

श्री

# अथः शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १३ | मौजे | तर्फ |
| ३ | ७ | पायफडे | पायफोड |
| ६ | २७ | एकाण हतीत | एकुणातींत |
| १० | १५ | केलेले | बोलले |
| ११ | २६ | केलज | केलेंजे |
| १३ | ८ | तफनी | तर्फेनी |
| १३ | २० | खल्यास | दाखल्यास |
| १३ | २३ | करणें | कारणें. |
| १५ | ४ | येऊन | ठेऊन |
| १७ | १३ | समजाऊ | समजाऊन |
| १७ | २६ | याच | याची |
| १८ | ६ | कबजपणापासून | लहानपणापासून |
| १९ | २९ | असो | असोन |
| १९ | २९ | अर्धे | असे |
| ४० | २२ | रु. १६ | रु. १० |

पान ८ वरील टीप चुकीची आहे. गणेश रखमांगद हे खंडो बल्लाळाचे मेहुणे (बायकोचे भाऊ) हे चिटणीसांचे मुतालिक होते, यांचे चि. रखमाजी गणेश यांस रघुजी भोसल्याबरोबर श्री शाहूमहाराजानें पाठविले. याप्रमाणें वाचावे.

२ नं. २५ व २६ ह्या याद्या व पत्र नं. ४४ ते ५३ हीं श्री. बळवंतराव रघुनाथ चिटणीस, इनामदार जैतापूर, यांजकडून प्रसिद्ध करण्याकरितां आमचेकडे आलीं त्यांपैकीं आहेत. बाकिची पुढील पुस्तकांत प्रसिद्ध करण्यांत येतील.

३ नं. २७ ची यादी पान ४४ वर चुकीनें छापली गेली आहे.

४ पान ५० वरील पत्र नं. ४३ आहे तें ४४ समजण्यांत यावे व पुढें त्याचप्रमाणें अनुक्रमण नंबर धरावा.

श्री.

# चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती.

## व

## यादी, सनदा-पत्रें.

\+ + + + +

* रावबावानीं केले ते आम्हीं त्या प्रमाणें चालतो. याचे स्वार्थाचे असेल ते आटोपणार त्याचे मागें + + + याचे नाहीं ह्मणतात, आणि इनामवतने चौघा भावास सारखी वाटली आहेत. त्यांत वडिलाचा वाटा वेगळा, चौहू वाट्या शिवाय आसावा. असें बोलणें **गोविंदराव बावानी** केले त्याजवर बोलणें बोलतात. हे आपले स्वार्थ परेन करितील. त्यास सारीयांनीं कबूल करावे न करावे, तरी हजार देणी घेणी भावाबंदाचे घरगुती कजिये आहेत. त्यात एखाद्यास खांद्यावर घेऊन आपला मतलब साधावा. असी करणी त्याची आहेत. त्याअर्थी इत:पर **श्रीमंत** कृपा करून सर्वांचे वर्तमान समजोन घेऊन, कागदींपत्रीं चौकसी करितील, असा दिवस आला, तर चौकसीचे अंती वाटणी केली आहे. तीच वाजवी अथवा समय परत्वें काळदेश वर्तमानावर नजर देऊन दिवस काढिले. हे सर्व ध्यानांत येईल. **गोविंदरावाचे** शील पवित्र चिरंजीव अथवा पुतणे दोन असे कल्पनेने करिते तर असी वैवाटच न करिते, आणि हाली **मलारीराव** याचे चालणें सदरहू लिहिले प्रमाणे पडते. त्या अर्थीं आमचे तर सर्वस्व जाणार त्या अर्थीं बोलणें प्राप्त आहे. **साडेतीन वाटण्या** केल्या. त्यात कलम लिहिले आहे. जे इनाम वतने, जी असतील ती चौघा भावांनीं सारखी घ्यावी. त्यांत चिटनि-

---

*ह्या बखरींतील वरील बंद फाटलेले आहेत. आंकडे नसल्यामुळें नक्की किती ते सांगता येत नाहीं

विसीचा वांटा नाहीं. असे असोन अलिकडे **मलारीराव** याणीं चाल घालीत चालले आहेत. वतनामध्यें वडील वांटा, ह्मणून प्रांत चेऊल येथील सरदेशमुखीचे इसाफतीचे गांव ते आपणाकडे वडील वाटयांस म्हणतात. हे त्यांस गैरवाजबी करितो. असें वाटत नाहीं. वरकड भावांनीं कांहीं बोलले असतां **रावसाहेबांनीं** केले. त्याचेपुढें जाऊं नये ह्मणतात. आणि रावसाहेबी इनाम वतन चौघा भावांस सारखें वांटले आहे. त्यांत वडील वांटा वगैरे कांहींएक नाहीं. आसे लिहिले आहे. त्याजवर चौघाच्या मान्यता आहेत. असे असता इसाफतीचे गांव आपले वडिलाचे वांटणीस ह्मणून काढितात. रावसाहेबी केल्याच्या पुढें जाऊं नये, असें ह्मणतात, आणि इसाफतीचे गांव आपलेकडे नवे काढावे, असे विचारांत आहे. हें करणें रावसाहेब याचे केले खेरीज करितात. हे वाजवी म्हणून म्हणतात ते आपले साधनाचे बोलतात ते वाजवी, आणि आम्ही आपले समाधानाचे बोलतो असतां रावसाहेबाच्या केल्या पुढें जाऊ नये असें म्हणतात. हें वाजवी कीं काय?

यासिवाय मौजे बोरगांव मौजे सिराळे हा गांव इनाम असतां निमे आपले चिटणिवीसी कडील ह्मणून वैवाटितात व निमे गांवांत साडेतीन वांटण्या त्यांतही वांटणी आपण घेतात हें काय? इनाम चौहू जागी म्हटले. तेव्हां बोरगांव चौघाचे भागास सारखे असावे, कीं नसावे? आसें असल्यास याची चौकसी व्हावी, ह्मणजे सर्व समजेल. त्याचें इनाम पत्र अथवा सरकारी राजपत्र जे असेल ते **गोविंदराव बावाचे** नांवाचें आहे. दुसरे कोणाचें नांवाचें नाहीं. दौलतीचे एकत्र वैहिवाटीमधी कर्जाचा पेंच (लागत नाहीं.) याचा होता. तो भाऊबंदाचें वांटणीस घ्यावा तर **खंडेराव बापूजी** व **बहिर खंडेराव** उभयता पहिले पासून विभक्त याजमुळें कारभार सारा **गोविंदरावबावा** याणीं केला. त्यांत सारें कर्ज वांटणीस घालावे तर ठीक नाहीं; ह्मणून थोडे बहुत कर्ज उभयतांवर घालून बाकी एकंदर कर्जाची बेरीज **रामराव जिवाजी** याणीं व **गोविंदराव खंडेराव** याणीं करावे. असें ठरऊन वैहिवाटीच्या वाटण्या केल्या. समजुतीनेंच हरएक करणें, त्या आर्थी जसा जसा विचार ध्यानांत येत गेला, तसे करीत गेले. त्याचे हिसेब आलाहिदा, घरचे दफ्तरांत असतील. या प्रमाणें भाऊबंदाची वैहिवाट चालत आली असता **रामराव जिवाजी** याचे मनांत आपला चिटणिसीचा सरंजाम आपण वडील असे **गोविंदराव बावानीच** कले. मोठे साधन जाणून या गोष्टीची गुंज बांधोन

**गोविंदराव बावा** असतांच बेरोख चालणे पडत गेले. दरबारी आमचे तीर्थरूप **लक्ष्मणराव** त्याचे मागें आम्हीं वेहिवाट करित आलो. हे न पहावे. तेवेळे. आमचें आपण पुढें जालों असतां चालणार नाहीं. असे मनांत आणून दिवस काढीत गेले; परंतु द्वेष मनः पूर्वक असे चालत आले. त्याजवरून एकच निःश्चये कोठेंहोतो. जुने त्याजकडे नवफत(?) वांटणी. असें ह्मणावे तोहि विचार नाहीं. यातील आर्थ पहाता भाऊपणाची वाढणी जसी असावी तसी नाहीं. आपले घरची पायफाडे होऊन बाहेर लौकीक जाऊं नये, अशा अर्थे समजुती करित गेले. असे असोन **रामराव जिवाजी** याचे पुत्र **मलारीराव** हे प्रत्यक्ष आह्मांस गोत्र पुरुषा प्रमाणें जमा धरितात. कांहीं एक सबंध नाहीं; असें करणें करितात. त्यांस या प्रमाणें मागील वेहिवाट असल्यास वाटणी जाली ह्मणतात, ती कशाची? हें धणी आणि आमचा संबंध नाहीं; आसी या प्रमाणें त्याची चाल आहे; तेव्हां यांत विचार कसा दिसतो, हें पहावे. आसी वेहिवाट कैलासवासी **माधवराव नारायणराव प्रधान** याचे कारकीर्दिपर्यंत चालली. **गोविंदराव बावाहि** त्या दिवसापर्यंत वर्तमान होते. याजमुळें त्याचे पुढें **रामराव** याचें आंतून द्वेष करणे हें कांहीं एक चालले नाहीं; नंतर कैलासवासी **श्रीमंताचे लग्न** जाले शके १७०६ संवत्सरी माघमासीं झाले. ते समयीं **गोविंदराव बावाहि** लग्नास पुण्यास आले होते. कारण **सखाराम हरि** संबंध कांहीं निमित्य ठेऊन सरंजामाची जप्ती एकंदर केली होती. **सखाराम हरि** किल्यावर बंदात होते. त्याची वस्तवाणी व कापड **रामराव जिवाजी** याजकडे **रामराव** याचे चिरंजीव **मलारीराव** हे **सखाराम हरि** चे जांवई सबब याजपासी दागिने वगैरे होते, ते निमित्य ठेऊन सरंमजामाची जप्ती केली. त्याचे मोकळीके करितां व लग्ना करितां पुण्यास आले होते. त्या समयीं सरंजामाचे मोकळीक करणें बद्दल सरकारात च्यार रुपये ठराऊन मोकलीक करून घेतली, आणि लग्न जाल्या नंतर चैत्रमासी घरास गेले, आणि आशाढ शुद्ध द्वितीयास कांहीं शरीर विकृत होऊन **गोविंदराव बावा** याचा काल जाला. मागे वडील **रामराव** सर्वास राहिले. मागील पहिली वांकडेपणाची गुंज त्याचे मनांत होतीच. ते **गोविंदराव बावा** गेल्यामुळें उघड वागू लागले, तेव्हां आम्हीं बोरगांवी श्रीमारुतिचें सेवेनिमित्य कुटूंबासुध्धा संतान नाहीं सबब राहिलो. वरकट कुटूंब पहिलेएकत्र प्रमाणे चालत होते तसे होते. नंतर **रामराव** याचे मनांत विकृत आलीजे. आह्मां सर्वास वेगळे काढावे, आणि

आपला विभाग आपण घ्यावा. आमचा विभाग आह्मांस द्यावा. एकत्र होतो तेव्हां कर्ज जाले. ते उभयताचे वाटावे. असे कितेक विचार मनांत आणून आम्हीं बोरगांवीं गेल्यावर आपणहि कुटूंबासुध्धां पांचा वर्षानंतर आले, आणि कजियास आरंभ केला. तेव्हां तेथें फिरून वाटण्यां उभयतांच्या, आमची व त्याची, **तीर्थरुपांच नांवें केली.** प्रसंगी आमचे तीर्थरूप ही होते. त्यात रावसाहेबी सरंजामाच्या वहिवाटीच्या समजुतीची वांटणी केली आहे. ती घेऊन आपली वहिवाट वेगळी करावी. कर्जवाम असेल ते निमेनीम प्रमाण घ्यावे. कारण एके-जागीं संसार होता. आमचा कुटूंबाचा मोठा, **रामरायाचे** कुटूंब लहान परंतु सरदारी खर्च त्याजकडे, त्यामुळें त्याजकडीळ च्यार रुपये आह्मांस लागले. आह्माकडील च्यार रुपये त्यास लागले. त्यापक्षीं दोहीकडील खर्च सारखा. आसे करून देणे व घेणे जे असेल ते निमेनिमे प्रमाणें घेऊन आपले आपले वहिवाटीचा सरंजाम घ्यावा. असे ह्मणणे **रामराव** याचे पडले, आणि संसार वेगळे वेगळे करावे त्यास वर्षे आदमासे चोवीस जाली. पूर्वी सरंजामाची वैहिवाट **रामराव** व आम्हीं उभयतां करित होतो. प्रसंगी ते नसल्यास आम्ही हरएक सरंजाम संबंधीं कामकाज करावे. आम्ही नसल्यास त्याणीं करावे. रुजू त्याणीं करावे. मखलासी आम्ही करावी. असी चाल पूर्वापार रावसाहेबापासून चालत आली. असताही मनाकरून सारेच आपण करूं लागले. आह्मांस एकिकडे ठेविले. कारण रावसाहेबाचा काळ जाला. राहिले वडील **रामराव.** त्यांचे पोटांत विकृती दौलतीतील कारकून कारभारी माणसे. त्याचे लक्ष **रामराव** याजकडे पडलें व आमचे तीर्थरूप याचा कारभार कंटाळेखोर होता. त्याणी कांहीं एक समजोन घेऊन करणे कोणतेहि करणे केले नाहीं. आम्हीं पुसत गेलो × × ची गती पुढें कशी आसे हे करितात. * * * * वाटकाय? ते ह्मणत गेले. याचे पाऊल पहिल्यापासून आसेच करण्याचे आहे; परंतु रावसाहेबापुढें न चालले. याजमुळें मात्र इतके दिवस लागले. हाली त्यांचा काळ झाला त्यांचे मनांत पहिलीच विकृत होती. त्यास हाली उघडपणें वाकडेपणाचे चालणे चालतात. त्यापक्षीं आपला विचार आपणहि आपले जागी करणे तसा करावा. असे, म्हणत गेले. रावसाहेब असता **रामरायाचे** पाऊल काढण्याचे असे दृष्टीस पडत चालले. त्याजवरून आम्हीं पुण्यामधीं नाना फडणीसाजवळ होतो. त्याची कृपा यथा काले होती. तेच वेळेस रावसाहेबासह आम्हीं पुण्याहून घरी आलो. ते वेळेस विचारले जे,

आपण ह्या वाटण्या काय समजोन ? कोणे अर्थावर कशा केल्या? चिटनिवीसी संबंध नाहीं. हें करणे काय चांगले केले? **बाळाजीबावा** तुमचे व **जिवाजी बावाचे** आजे त्याची मेळविली चिटनिवीसी त्या **बाळाजी बावाचे** आम्हीं सारे असतां आपण हे करणें असे कसे केले. **रामरावाचे** पाऊल नीट दिसत नाहीं. आताच दूर दूर धरून चालतात. आपले भिडेमुळें कांहीं चालत नाहीं; ह्मणून मात्र उगेच आहेत. वरकड पुढें आह्मांस कांहीं एक ठिकाण लागोदेणार नाहींत. असे स्पष्ट त्याचे चालण्यावरून दिसते. त्यापक्षीं याचा विचार आपण कांहीं करून आह्मांस द्यावा. हें चांगले नाहीं तर आह्मांस याचा विचार करणें येईल, आणि पुण्याचे रस्त्यानी हा जाबसाल फिरेल असें होऊं नये. त्याजवरून रावसाहेब बोलले जे. आम्हीं समजूत केली आहे. याप्रमाणें चालावे. असे असोन तुम्हीहि **रामराव** विरुधानी वागू लागल्यास, तुम्हीं ह्मणता ते खरे ! आह्मांपासून ही गोष्ट चुकली खरी त्यांस याची योजना आम्हीं मनांत आणून ठेविली आहे. च्यार गांव खेडी **रामराव** याजकडे आधिक टाकली आहेत. त्याचे कारण मिळोन **रामरायाचे** तीर्थरूप **जीवबा** साहावे वर्षी **रामरायाचे** वारले. तेव्हां त्याचे पालण आजपर्यंत आम्हीं करून लहानाचे थोर केले. त्यापक्षीं, तुम्हीं त्यासी लागून आसावे. ते तुह्मांस आंतर देणार नाहींत आसे समजोन सरंजाम पै॥ च्यार गांवखेडी आधिक त्याजकडे ठेविली आहेत. याचे कारण, आपला खर्च मोठा ह्मणोन सरंजाम पै॥ वांटणी आधिक घ्यावी. तर सर्व भावांस बराबर द्यावे लागले. याजकरितां **रामराम** याजकडे ठेविली. गांव खेडी आधिक आगळी आहेत. ती **तुह्मांकरितांच**, असे असोन, आतां त्याचे पाऊल द्वेषाचे, असे तुम्हांस दिसते. त्यापक्षीं आम्हांपासून गोष्ट चुकली ह्मणता, हे खरे. वरकड आम्हीं, करणे जे केलें, ते चांगलेच होते. त्याची चाल, आसी पडल्यानें तर तुम्हीं ह्मणता ते खरे? तूर्त गडबड करूं नका. याचे साधन मी युक्तीनें तुह्मांस करून देईन असे ह्मणाले. तेसमयीं जवळ **आपाजी शामजी** होते व कैलासवासी मातुश्री **बाया** होती. इतके ऐकोन आम्हीं स्वस्थ राहिलो. पुढें साधन करून घ्यावे, तो नागपुरास चिरंजीव **राजेश्वरराव** याचे लग्नाकरितां गेलो. मागे **गोविंदराव बावाचा** काळ जाला. काळ होते समयीं तीर्थरूप कैलासवासी **लक्ष्मणराव भाऊ** आमचे वडील जवळ होते. त्याणीं विचारिले जे. आपला अंतःकाळाचा समय आला. कांहीं सांगावयाचे बोलावयाचे असेल ते सांगावे. ते समयीं खूण सांगितली जे. **बाळा** आपणापासी बोलले होते. तेसमयीं,

आपण उत्तर केले जे. येविसीचे साधन तुह्मांस करून देईन. त्यास कांहीं सांगावें ह्मणोन विचारले; परंतु तो समय कांहीं बोलणें व लेहून देणे सामर्थ्य राहिले नाहीं. ते समयीं रावसाहेबी उत्तर केले. जे समयीं बोलावे, लिहून घ्यावें, विचारावें, ते तुम्हीं कांहींच विचारले नाहीं. यासमयीं कांहींएक बोलवेत नाहीं व लेहूनही देवत नाहीं; परंतु ही सनद आहे ही घ्यावी. यात काय आहे, तें तुम्हीं करावे व सरकारी सातारियात आमात्याचे दफ्तरी दाखला ही पुरेल. ते पाहून जो उद्योग करणे तो करावा. **रामराव** तुम्हांसी नीट चालल्यास तुम्हीं कांहीं हा उद्योग करू नये. नीट नचालेत तर हा उद्योग तुम्हीं करावा. त्याजवरून **गोविंदराव बावा**चा काळ जाल्यावर वडीलपणा व एकंदर सरंजामाची वेहिवाट करणे हे सारे मखलासी आम्हीं करित होतो. त्या सुध्धा त्याणीच आटोपिले. त्याजवरून आम्ही त्यासी दाहा बारावे वर्षपर्यंत, त्याचे अर्जवानीच होतो. कारण वडिलाचे सांगणें त्यासी मिळोन असावे. त्याप्रमाणें मखलासी आदिकरून हरण करित गेले. परंतु आम्हीं त्याची मरजीच राखित गेलो. आमचे प्रपंच्याची सोई तुम्ही पाहावी. तुह्मांसी आम्हीं लागून चालावे. असा मार्ग पहिल्यापासून आहे. असे ह्मणत असता जे **गोविंदराव बावा** असता मखलासी वगैरे कारभार आम्हीं करित होतो. ते सारेच वडीलपणाचे. **गोविंदराव बावा** वारले तेव्हां कोणाचे कांही ठेवावयाचे नाहीं. आसकरण्यावरून स्पष्ट समजले. तेव्हां **आवजी बापुजी देशपांडे** मोसेखोरेकर हे आमचे दौलतींतील जुने कारकून माहित. प्राचीन पदरचे वयोवृध्ध **गोविंदराव बावा** आसता व त्याचे पाठीमागें साऱ्याच कारभारास माहित. त्याणीं पुण्यांत आम्ही व तीर्थरूप कैलासवासी **लक्ष्मणराव भाऊ** व **रामराव** याचे चिरंजीव **मल्हारीराव** हे ही होते. त्या **आवजी बापुजीस** समाधान फारच नव्हते, तेव्हां व कामकाजात आमची व त्याची चितशुध्ध नाहीं. असे **आवजी बापुजी** याणी पाहून उभय पक्षीं एक विचारे चालावे. विरुध्धानी चालले असता दौलतीस आपाय. असे मनांत आणून त्यासी व आह्मांसी बोलोन ठरावाची याद केली. ती याद चिरंजीव **मलारीराव** याणी बसून **भिमाजी बापुजी, आवजी बापुजी** याचे कनिष्ट बंधू याद कलंबंदीबंदीवार लेहविली. आणि **आवबानी** खाली आपले स्वहस्ते एकुणात केली. एकाण हतीत लिहीले आहे जे. सर्व श्रीमंत एक विचारे चालावे न चालल्यास दौलतीस आपाय होईल व याखेरीज * **धणी** साहेबाचे वचन †**रावसाहेबास** व **रावसाहेबाचे** वचन

---

**टीप**—*रामराव जिवाजी †गोविंदराव खंडराव

**धणी** साहेबास आसेल. त्या केल्याप्रमाणें करावे. त्याजर **मलारीराव** याचा व आमचा लेख आहे. ते आस्सल याद **मलारीराव** याजपासी दिल्ही व नकल नारायण रामचंद्र ह्मणोन कारकून **मलारीराव** याजकडे असतो. त्याची हतची हाली आह्मापासी आहे; नंतर आठचौहू दिवसी **आवबाचा** काळ जाला. त्या यादी प्रे॥. उभयतानी चालावे. छंदी स्वभाव बोरगांवी उभयता **मलारीराव** व आम्हीं घरास गेलो. तेथें यादीचे विचारिले. तेव्हां **मलारीराव** याणी उत्तर केले, आमचे वडील **रामराव** ह्मणतात कीं **आवबा** कोण? चाकर, त्यास यादी करून देण्याचा अधिकार काय? ती यादी, कांहीं आह्मांस मान्य नाहीं. तुम्हीं आपले लिहिले का दिल्हे. असे वडील ह्मणतात. त्यापक्षीं आह्मीं काय करावे? असे ह्मणून **मलारीराव** याणी आह्मांस सांगून निघोन वेगळे जाले. आह्मीं कांहीं त्या(चा) पिछा सोडला नाहीं. फिरून पुण्यास गेलो. तेथें ही बोलणें बोलतच गेलो. सेवट कैलासवासी **रावजी आपाजी** सुभेदार किले सातारा, याचा व आमचा स्नेह बहुत, त्यास हे बोलाचे वर्तमान सांगितले, व यादहि दाखविली. त्याजवर **रावजी बावा** आमचे तर्फेनीं **मलारीराव** यासी बहुत प्रकारें बोलले. तत्रापि **मलारीराव** याणीं हजार बाहानें सांगून आह्मांस या प्रमाणें स्पष्ट चालावयाचे नाहीं. असें रावजीबावापासी आह्मांस सांगण्याविसी सांगितले, आणि त्याच सांगण्यांत सांगितले जे. हे दरबारी फिरतात. याचे वळण ह्मणून आम्हांस दबावितात. या उपरी आह्मांसही याच्या दाबास दबावयाचे नाहीं. त्यासही काय कर्तव्य आसेल ते करावे. असें स्पष्ट आह्मांस सांगावे. आह्मांसही आमचे दैवाची परिक्षा पाहावयाची. जे करणें ते करावे. ह्मणोन साफ सांगावे, ह्मणून रावजीस सांगितले. त्याजवरून रावजी बाजीबावानीं आह्मांस उत्तर त्या प्रमाणेच सांगितले. आह्मीं या उपरी कळेल तसे करावे, करावे, करावे, असे तीन वेळ रावजी बावासी बोललों. त्याणीं ही स्पष्ट सांगितले जे. आमचे प्रात्तनाची परिक्षा, आह्मांस पाहवयाची आसे. **मलारीराव** ह्मणतात त्यापक्षीं, तुह्मीं काय विचारता? तुह्मांस कर्तव्य असेल ते करावे. असें त्याचें ह्मणणे रावजी बावांनीं सांगितले. मग चिरंजीव **राजेश्वरराव** यांस सातारियास पाठऊन राजश्री **दादा भिकाजी** डौलाकडील चिटनिवीस याची चाल सातारियांतील कार * * कैलासवासी सदाशीव अनंत अभ्यांकर ह्मणून नाना फडणीस याचें तर्फेनीं फडणीविसीवर होते. तेच सारा कारभार एकंदर वेहिवाटीत होते. त्याचें कानावर

भार

**दादा भिकाजी** याची भेट घेऊन फडणीवीस यासी भेटून कैलासवासी **गोविंदराव बाबानी मातुश्री आई साहेब** याचे वेळेची चिटनिविसी कडील मुतालकीची सनद दिल्ही होती. ते प्रकरण समजाविले. त्याचे मनांत पकेपणे, हा जाबसाल खरा आहे, असे आणून दिल्हे; नंतर त्यार्णी उद्योगास आरंभ केला. त्यावेळेस कैलासवासी निळकंट बाबुराव आमात्य होते. त्यांस सांगून पाठविले. सदाशिवपंतार्नी जे कैलासवासी **शाहू महाराजाचे** कारकिर्दिस चिटनिविसीचे मुतालकीचा धंदा सरकारांतून कोणाकडे होता. त्याचा दाखला दप्फरचा दाखला कसा आहे, तो लेहून पाठवावा. असें सांगून पाठविले. नंतर त्यार्णी मजमूकडील दप्फरदार सोयरोबा म्हणून सेणवी होता. त्यास मरून त्याकाळीं पासष्ट वर्षे जाली होती. त्याचे हातचा दाखला, ***गणेश रखमांगद** यांस मुतालकीची वस्त्रे व साडेतीन गांव व मौजे बोरगांव व मौजे सोनवडी मौजे कारसे व मौजे वरुड एकूण साडेतीन गांवच्या सनदा, त्या वेळेस गुजरून मुतालकी सांगितली. असा दाखला काढून त्या सोयरोबा दप्फरदाराचा नातू आहे. त्यार्णी आणून, सदाशिव अनंत अभ्यांकर याजपासीं दिल्हा. नंतर सदासिवपंत यार्णी त्या दप्फरदारास कसुन विचारिले. नानाफडणीसाचा कारभार चौकसीचा आहे. हें तुम्ही दाखल्याचे लिहिले काढून दिल्हे आहे हे नानाचें कानावर घालून चिटनिविसीचे मधीच पोकळी. मुतालकीचा सरंजाम खातात तो दूर करून **लक्ष्मणराव गोविंद चिटनिवीस** याजकडे सांगण्याचा आहे त्यास खचित तुम्हीं लेहून दिल्हे असेल तरी उत्तम आहे. नाहींतर नानाचें चौकसीत लबाड पडेल, तर दप्फरदार याच्या आसाम्या बाद घालीन व गुनेगारी सरकारां(त) घेईन. असें बोलोन दाखला, मजमुचे दफ्तरचा आपले जवळ घेतला. दप्फरदार यार्णी उत्तर केले. हें खोटें होईल तर आपण आह्मा-जवळ गुन्हेगारी घेतील हे मुळेंच खरें आहे. त्यापक्षीं पाहिजे तसें आपण बोलावें. पुण्याचे दप्फरी चिटनिवीस यार्णी गैर वाका समजाऊन आपलें नांव सरंजाम म्हणून उगऊन घेऊन गैर वाका समजाऊन खात असल्यास त्याचा जाबसाल चिटनिवीस करितील. आह्माकडील हुजूरचें दप्फरी याप्रमाणें दाखला

---

*नागपूरकर चिटणवीसाचे मूळ पुरुष व खंडो बल्लाळ चिटणवीस यांचे भाचे. ही माहिती श्री. रा. बळवंतराव रघुनाथ चिटणीस यांनीं दिली.

खचीत् आहे. आपण उद्योग करावा. असे पकें करून सदाशिवपंत पुण्यास कार्तिक मासी आले. नानाफडणवीस व हरिपंत, (फडके) कारभार करीत होते. त्यांचे कानावर हें वर्तमान सदासिवपंत याणी घालोन पोकळीस मुतालकीचा सरंजाम चिटनिवीस **रामराव** खातात. असें आसल्यास **लक्ष्मणराव गोविंद चिटणिवीस** याचें नावें मुतालकी व मुतालकीचा सरंजाम करून द्यावा. सरकारची चाकरी **लक्ष्मणराव** याणीं व त्यांचे वडील **गोविंदराव** याणीं बहुत केली. त्यास हें मुतालकी करून द्यावी. असें नाना व हरिपंत तात्या याणीं सांगून मखलासीची यादी व नजरेचा ठराव करून यादीवर मखलासी द्यावे. देणें करून यादी केली. साडेतीन गांव मुतालकीस आहेत. त्याच्या संदा श्रीमंताच्या निशाण, सिकेसुधां व नांवाची सनदसुधा करून सदासिवपंत याणीं आपणाजवळ घेऊन आह्मांस बोलाऊन सांगितलें जे. यादी ठरावाची करून आम्हीं आपले जवळ घेतली. संदा तयार जाल्या आहेत. तुह्मीं ऐवज नजरेचा सरकारचा ठराविला त्याची तजवीज करावी. संदापत्रें, **श्रीमंता**च्या नांवाच्या गांवगना करून घेतल्या व वस्त्रें माहाराजांचीं देववितों व कलमदानही देववितों. पैक्याची तरतुद लौकर करावी. त्याजवरून आह्मीं कैलासवासी परशरामपंत भाऊ पटवर्धन हेहीं पुण्यांत होते. त्यांचा व **लक्ष्मणराव भाऊ** आमचें तीर्थरूप याचा स्नेह बहुत पहिलाच होता. त्याजकडे गेलों. त्यांस जाले वर्तमान सविस्तर सांगितले. हें काम केलें आहे. त्यांस पैका आपण द्यावा. संदापत्रे आपणापासी देतों. व राजश्रीची वस्त्रें आम्हीं घेऊन संदा व वस्त्रें आपणा जवळ गाहाण ठेवितों, आणि ऐवज द्यावा. पुढें गांवची वैहिवाट आपण ऐवज फिठे तोंपर्यंत करून आपले जरबेनीं हा कारभार सेवटास न्यावा. असें बोलल्यावरून भाऊनीं उत्तर केलें. येथें ऐवजाची सोई होणार नाहीं. दोनचार दिवस आम्हीं तासगांवी * * * * * * णजे तुमचें बोरगांवची मामलत गंगाधरराव गोविंद मिरजकर भाऊचें चुलत बंधू याजकडूनच नजरेचा ऐवज देववितों. या प्रमाणें बोलले नंतर निघोन तासगांवास गेले. मागाहून आह्मींहि बोरगांवास गेलो. तीर्थरूप कैलासवासी **लक्ष्मणराव भाऊ** पुण्यासच होते. आह्मीं बोरगांवी जाऊन तासगांवी गेलों. तेथें भाऊची भेट घेतली. वर्तमान त्यांस पूर्वी पुण्याचें मुकामीं समजाविलेंच होते. आणखी समजाविले. नंतर भाऊ बोलले जे. भिड्याकडून आमल बाळासाहेब बोरगांवची वहिवाट करितात. त्यास आम्हीं प्रातःकाळी मिरजेस जातो. आपण समागमे चलावे.

त्यासीं बोलून ऐवज त्याजकडूनच देववितों. असें बोलोन परशरामपंतभाऊ निघोन दुसरें दिवसीं मिरजेस गेलों. नंतर त्याचे दुसरे दिवसीं आम्हीं व **जीवनराव माधव** मिरजेस गेलों. **जीवनराव** याणीं जाऊन भाऊंस सांगितलें जे. रघुनाथराव बंधुजीस आपण बोलाविलें. त्या प्रमाणें आले आहेत, नंतर आह्मांस किल्यांत यावें ह्मणोन सांगून पाठविले. त्याजवरून आम्हीं किल्यांत गेलों. बाळासाहेब याची व भाऊची भेट घेतली. तेच वेळेस भाऊ माघारे तासगांवी जावयास निघाले होते. ते श्रीपतराव मोरेश्वर याच घरीं किल्यांत राहिले होते. ते वेळेस बाळासाहेबही तेथें भाऊ तासगांवी जाणार ह्मणून निरोपास आले होते. तेथें बाळासाहेब यांस भाऊनीं मुतालकी प्रकरण सविस्तर समजाविलें, आणि सांगितलें जे. बोरगांवचा आमल तुम्हीं भिडे याचें आगत्यात वैहिवाटीतच आहा. त्यासही हाही सरकारी नजरेचा ऐवज, तुम्ही देऊन आमलाची वहिवाट करावी. त्यांस बाळासाहेब याणीं उत्तर केले जे. बोरगांवचा पैका भिडे याणीं दिल्हा आहे. मीं कांहीं खासगत ऐवज दिल्हा नाहीं. आमचें दाबानी भिडे वैहिवाट करितात. त्यांस सरकारी संदा जाल्या आहेत. त्यापक्षीं कोण्हीही आमल केला. ह्मणून चिंता नाहीं. त्याजवरून × × × केलेले जे. आम्ही पैका देतों. तुह्मांला कारकुनास ताकीद करून निमे आमल तुह्मांकडे चालावा. आसें निश्चयेपूर्वक टरावून निरोप घेऊन निघोन तासगांवास आले. आम्हींही दुसरे दिवसीं तासगांवीं आलो, आणि **जीवनराव माधव** नि॥ कैलासवासी **त्रिंबकराव तात्या श्रीमंताचे** चिटनिर्वीस हें तात्याचे तर्फेनी भाऊ जवळ सरकारचा जरीपटका होता. त्याजमुळें दरखदार सरकारी सारेच फडणीस आदिकरून होते. त्यात चिटनिसीकडील कारकून **जीवनराव** होते. त्याचे विद्यमानें भाऊजवळ नजरेच्या ऐवजाचे बोलणें करून ऐवज देतों, ऐसा ठराव करून निःश्चय केला. आणि भाऊनीं सदासीव अनंत आभ्यांकर यांस आपलें पत्र दिल्हे जे. सरकारांतून **लक्ष्मणराव चिटनिवीस** यांस मुतालकी वस्त्रें **राजश्री छत्रपति स्वामी** याजकडून देवावी व मुतालकीचे सरंजामाच्या संदा व नांवाची सनद श्रीमंताकडून जाल्या आहेत. त्या तुम्हीं आपणाजवळ घेऊन आला आहा. त्या तुह्माजवळ आहेत. ह्मणून राजश्री **रघुनाथराव बंधुजी चिटनिवीस** याणीं सांतितल. त्याजवरून कळेल. **लक्ष्मणराव भाऊ** याचा व आमचा स्नेह बहुत आहे. याजकरितां याचें काम आह्मांस करणें जरूर त्यांस तुह्मीं माहाराजांची वस्त्रें व मुतालकीचे कलमदान **लक्ष्मणरावभाऊ**

यांस देऊन **लक्ष्मणराव** याचें पत्र आह्मांस घेऊन पाठवावे जे. वस्त्रें व कलमदान हुजूरचे व **श्रीमंता**च्या संदा गांवगनाच्या नांवाची सनद आह्मांस सदासिवपंत याणीं दिल्या, ह्मणोन पत्र **लक्ष्मणराव भाऊ चिटनिवीस** याचें घेऊन पाठवावे. त्या समागमे तुमचा कारकून पाठवून द्यावा. त्याजबराबर भाऊचे पत्र आल्यास कारकून देईल, त्याजपासीं नजरेचा ऐवज रोकड देऊन रवाना करून देऊं. खातर जमा असो द्यावी. खातर जमेनी काम करावे. असें पत्र परशरामपंत भाऊनी आह्मांसी दिल्हे. ते आह्मीं बोरगांवीं आलो. तेच दिवसीं रातोरात पत्र सातारी यास चिरंजीव **राजेश्वरराव** होते. तेथें पाठविले. **राजेश्वरराव** याणीं भाऊचें पत्र सदासिवपंतास दिल्हे. ते पत्र पाहून सदासिवपंत याणीं तेच वेळेस मुहुर्त पाहिला. तोहि चांगलाच होता. बाबुराव किलेदार यास चिटी लहून दिल्ही व वस्त्रें देण्या-विषीं श्रीमंताचें पत्र **बाबुराव** यांस होते. ते व सदासीवपंत याणीं **राजेश्वर-राव** यांस देऊन किल्यावर पा। चिरंजिवानीं सदासिवपंताची चिटी व श्रीमंताचें पत्र वस्त्रें देविवण्याविसीं होते ते दिल्हे **बाबुराव** यासीं आणि चिरंजीवानीं तीर्थरुपाचे नांवें वस्त्रें व कलमदान हुजरून **स्वामीकडून** देववीली. त्याप्रमाणे घेतली. ते घेऊन किल्या खाली आले. तेच दिवसीं बोरगांवाहून आह्मीं येऊन सातारियास पोहोंचलों. सदासिवपंताचीं भेट घेतली. सदासिवपंताचें ह्मणणे पडले जे. भाऊचें पत्रावर आह्मीं वस्त्रें तर दिल्हीच. त्याणीं कारकून बोलाविला आहे. तो पाठवितो. ऐवज करारा प्रे॥ देतील, यांत सशंय नाहीं; परंतु तुमचें व भाऊचे बोलणें समक्ष जाले आहे. तुम्ही इकडे आला. याजकरितां तुम्हीं फिरून तासगांवी जाऊन भाऊपासून ऐवज घेऊन कारकून याजपासी देऊन सत्वर पाठवून द्यावा. त्याजवरून भाउसी बोलण्यांत आमचा करारच होता. सनदा सरंमजामा-च्या आणून आपणापासीं देतो. त्याप्रे॥ संदा व वस्त्रें घेऊन व सदासिवपंताचा कारकून खंडोबा नाईक यांस घेऊन दुसरें दिवशीं फिरून तासगांवास गेलो. वस्त्रें व संदा भाऊचे पुढे करारा प्रे॥ ठेविल्या. त्याजवरून बहुतच संतोष जाले. करारा प्रमाणें संदा व वस्त्रें आणिले. सबब संदा आपणापासीं घेउन, गोपाळपंत ह्मणोन कारभारी होते. त्याचें स्वाधीन केल्या. त्यांस ताकीद केली ज. जतन बहुत निगेनी ठेवावे व वस्त्रें परत आह्मांस दिल्ही. आणि सांगितलेजे. ही वस्त्रें पुण्यास भाऊकडे पाठवावी. दुसरे दिवसीं आह्मांपासून खत लेहून घेऊंन, कराराप्रमाणें ऐवज गणपतिसिका, खंडोबा नाईक याचे पदरीं घालोन. पंचवीस स्वार बराबर देऊन

6 APR 1990

सातारियास ऐवज पावता करून सदासिवपंताची पावती आणून, भाऊनीं आपणा जवळ ठेविली. नंतर श्रीमंताच्या सनदाच्या नकला करून व तीर्थरूप कैलासवासी **भाऊसाहेब** याचें नांवाचीं पत्रें गांवगना घेऊन सरकारच्या संदाच्या नकला, वहीपत्रें, बोरगांव आदिकरून गांवोगांवी कारकून पाठवून आमल बसविला. तो ई॥ पासून तीन वर्षेंपर्यंत सारखा आमल चालला. सदासिवपंत याणीं जे समयीं नानासी मुतालकी प्रकरण समजाऊन काम करून घेतलें. संदां पत्रें घेतली. त्या समयीं सदासिवपंत याणीं नानाचें व हरिपंताचें वचन घेतले जे. **रामराव** हा कारभार केला. हा गैर वाका ह्मणून सरकारांत समजावितील. त्याजवरच आपण **लक्ष्मणराव चिटनिवीस** याजकडील धंद्याची घालमेल करितील, तरी, असे मात्र करूंनये हें मुतालकी प्रकरण खरें आहे. ह्मणून मी सरकारांत समजाविल आहे. त्यास **रामराव** बोलू लागल्यास मजला कळवावे. मी येविसीची उत्तरें करीन. त्याजवरून नानानीं सदासिवपंतास सांगितले जे. तुह्मांस समजाविल्यासिवाय मधीं कांहीं एक **लक्ष्मणराव चिटनिवीस** याजकडील धंद्याची घालमेल करणार नाहीं. खातरजमा आसो द्यावी. असें वचन नानाचें सदासिवपंत याणीं घेतले होतें. नंतर हें वर्तमान वर्षें जाल्याचे **रामराव** यास कळोन, त्याणींहि पुण्यास जाऊन उद्योग आरंभिला. नानाचे कानावर हस्तांतरे करून घालविले जे. हें आपण केले, हें गैर वाका याची चौकसी करावी. ह्मणून **रामराव** याचें ह्मणणे पडले वरून, सदासिवपंत यांस नानानीं लेहून पाठविले जे. येविसीं बोलणें **रामराव** बोलतात, हें तुह्मांस समजोन नंतर करणें तें करावयास येईल. ह्मणून पत्र सदासिवपंतास नानानीं पाठविले. त्याचीं नकल हाली, आह्माजवळ आहे. अस्सल पत्र सदासिवपंतापासीं आहे. त्या पत्राचें उत्तर सदासिवपंत फडणीस याणीं कलमबंदीवार दोनतीन बंद लेहून पाठविले. त्यांत सविस्तर जाबसाल आहेत. त्याचीही नकल आह्मांजवळ आहे. सदासिवपंत यानींच सदरहू नकल करून आह्मांकडे पाठविली जे. याप्रमाणे आह्मीं नानास पत्र लिहीले आहे. सदासिवपंतानींच त्या समयीं पुण्यास जावें; परंतु नानानी कांहीं हे काम तुमचें विद्यमानेंच आहे. याजकरितां तुम्हीं यावे. असें लिहिले नाहीं. सबब मशारनिले पुण्यास गेल नाहीं. या ह्मणून पत्र येईल त्याचीं वाट पाहात होते; परंतु येण्याविसीं पत्र कांहीं आले नाहीं. चाकरीचा पेशा विनाबोलाविल्या खेरीज जाता नये. सदासिवपंतानीं जे पत्र नानास पाठविले तेही पत्र नानानीं वाचून पाहिले न पाहिले नकळे. ते पत्र तसेंच त्र्यंबकराव

नारायण परचुरे याचे हातात दिले, आणि उभयतांचे मनास आणावे ह्मणून दरबार खर्च खाऊन त्या लोभानीं सदासीवपंतास आणून चौकसीं करावी. ते न करितां त्र्यंबकराव परचुरे याजकडे मनास आणण्यास सांगितलें. त्र्यंबकराव याचें घरीं सारे राज्याचा कारभार. तेथें हेंच मनास आणित ते कोठें बसणार? त्याणीं राघो सदासिव थत्ते याजकडे सांगितले. त्र्यंबकराव यास **रामराव** याणीं दरबार खर्च काय दिल्हा असेल, ते त्र्यंबकराव जाणत. आम्हीं कोणास दरबार खर्च वगैरे कांहीं एक दिल्हा नाहीं. जे देणें करण ते नानासच दिल्हे. त्र्यंबकराव पहिल्यापासूनच **रामराव** याचें तर्फनीं बोलत होते. राघोपंत थत्ते याचा व **विठ्ठलराव पोतनीस** याचा स्नेह बहुत. **विठ्ठलराव पोतनीस, रामराव** याचे जांवई त्याचें हातून राघोपंत थत्ते यासीं बोलोन च्यार रुपये खर्चवेंच करून त्याणीं आपलें घरीं बसोन **रामराव** यांस सारांश करून दिल्हा. त्यांजवर कांहीं व समक्ष देखील आमचीं त्याचीं भाषणें उत्तरें प्रत्योतरें व्हावी. त्या सुध्धा कांहीं एक जाले नाहीं. **रामराव** याणीं सांगितलें. राघोपंत व त्र्यंबकराव याणीं दरबार खर्च खाऊन सारंश **रामराव** यांस करून दिला. त्र्यंबकरावही त्यांत पुर्तेसें माहित असतील असें वाटत नाहीं. कारण त्यांस मोठे कामामुळें फुरसदच पडत नाहीं, असें होते. दरबार खर्च मात्र खावयाचे धणी सारे जे करणें ते राघोपंत थत्ते याणींच करून दिल्हे. तो सारंश नाना समक्ष यावा. **नानानीं** आह्मांस विचारावे. त्या समई **नानानीं** आमचे समेटपत्र, किंवा सारंशावर मान्यता आंमचीं वाजबी जाले. ह्मणून करून द्यावे. त्यास नंतर सारंश रामराव याजकडे सरकारी अस्सल सारंश खल्यास ठेऊन त्याची नकल वैवाटीचे भोगवटीयास **रामराव** यास उलट संदापत्रे करून देऊन मग द्यावा. सारंश आधी याजपाशीं आला आहेच. पक्षपाती करणें किंवा वाजबी केल. हें कोण्हीं धनी असेलतर चौकसी केली असती, वाका किंवा गैरवाका सर्व ध्यानांत येईल. करणें दोन. एक कारण चिरंजिवास मुख जबानी सांगितले आहे. दुसरें कारण मोंगलाचीं गडबड जाली. तेव्हां खरड्याचे स्वारीस श्रीमंत कैलासवासी **माधवराव** साहेब निघाले. त्या गडबडींत हा जाबसाल कोण पहातो? याजमुळें तसेंच राहिल. गांवगना आमल चालत होता. तो तसा चालतच होता. नंतर श्रीमंताचीं स्वारी बाहेर निघाली. **रामराव** ही स्वारी बरोबर निघाले. आम्हीं स्वारी समागमें जावे तर नानापासीं राहून उपयोग तूर्त काळीं नाहीं. कारण सदासिवपंत यास येविसीचें वचन आसतां,

इकडे परभारे त्यांस टाकून सारंश जाला. त्यापक्षीं नाना दरबार खर्च खाऊन करणें करितात. असें पक्केपणें समजले. त्याजवरून राजश्री **परशरामपंत भाऊ** याज समागमें जावें. असा निश्चय करून, करून, कारण या कामास पैका त्याणीं दिल्हा व त्याचें वचन ही होते जे. सारंश गैर वाका जाला याची चिंता न करणें आह्मीं ही गडबड उरकली ह्मणजे **नानास** सांगून समक्ष तो सारे आणऊ. **राम-रायास**ही आणऊ. तुह्मांस घेऊन जाऊन सारांशावर बोलणें करून नाना व आम्हीं समजोन घेऊं. नंतर जाला सारंश, खरा अथवा खोटा, हे ठराव करून मग जें करणें तें करूं. तोंपर्यंत तुम्हीं चिंता न करावी. आमल सोडणार नाहीं. असें वचन सरकारांतून या प्रों गर्दी जाली आहे. आम्हीं संदा पाहून पैका दिल्हा. याची चिंता न करावी. असें ह्मणणें वाजबी विसी भाऊचें होते. त्या अर्थी त्याचाच कश्यप धरून वागणें प्राप्त जाले. तेव्हां तीर्थरूप सुध्धा आम्हीं भाऊपासुनच आणखी च्यार रुपये कर्ज घेऊन भाऊ बराबरच लष्करांत गेलो. भाऊसीं बोलणें केले जे. सदासीवपंतास टाकून नानानीं पंचाईत करविली. त्यांत आह्मांस देखील बोलाविले नाहीं. असें करून **रामराव** याणींच जसा पाहिजे तसा सारांश केला आहे. त्यांस आपण नाना समक्ष बसावे. तो सारांश आणवावा. **रामराव** यांस बोलवावे. आपण आह्मांसमागमे घेऊन जावें. आणि उत्तरें प्रत्योतरें उभयतांचें समजोन घ्यावे. आणि जरी त्याणीं सारांश केला. तो खरा जाला तर केलाच आहे. नाहींतर आह्मांस दुसरे ताकीदपत्र करून द्यावे. आणि आमलास तर अडथळा जाला नाहीं व पुढेंही होऊनये. या प्रमाणें बोलोन ठेविले होते. भाऊनीहि याप्रमाणे मान्य केले होते. कारण पैका देणाराही तेंच व स्नेही वाजबीचे सोबती. याजप्रमाणें नानाचीं गांठ घालोन करितों असें बोलले होते. पुढें फौजांत श्रीमंताची फौज पाठीमागें दाहा बारा कोशावर होते. सड्याफौजा पुढें जाल्या होत्या. त्यांत परशराम भाऊची नेमणूक जाली होती. त्याजसमागमें आम्हीं गेलो होतो. नंतर गडबड जाली होती. लढाई होऊन मोंगलाचा पराजय जाला. नंतर कांहीं स्वस्थ जाले. नंतर भाऊस आम्हीं विचारिले. नानांची आपली गांठ पडोन बोलणें व्हावें. त्यांस लांबण पडली. आणखीही किती दिवस लागतील नकळे. याजकरितां हा योग तर एक वेळा जालाच पाहिजे. मधीं रिकामें बसावें. ते आपले विचारास आले, तर, आम्हीं श्रीमंतांचे लष्करांत मागें जातों. एक पत्र आपले वकील बाळाजीपंत सहस्त्रबुधे आहेत. त्यास द्यावे जे.

**चिटनिवीस** याचा सारांश जाला आहे. तो खोटा आहे. याची चौकसीं, फिरून चौकसी करून उभयतांचें खरेंखोटेंपण मनास वाजबी मनास आणावे. त्याप्रमाणें **लक्ष्मणराव चिटणीस** चालतील. असें पत्र बाळाजीपंतास भाऊचें घेतले. तें पत्र बाळाजीपंतास दाखवून आम्हीं आपल्यापासीं बजिनस येऊन घेतले आहे. नंतर मागील श्रीमंतांचें लष्करांत आलो. बाळाजीपंतास पत्र दाखऊन बजाबा सिरवलकर याचीहि भेट घेतली. त्यांस हे वर्तमान माहीत होते. व आणखीही समजाविले. बज्याबानीं खातरजमापूर्वक सांगितलें जे. मी नानाचें कानावर घालोन मनास आणण्याची परवानगी मी आपलेकडे घेतो. याप्रमाणें बोलले. तों तेच दिवसीं दरबारास नानाकडे डेऱ्यास बजाबा गेले. त्यासमयीं **रामराव** याजकडील संदा घेऊन सखोपंत साने पुरंदरचें फडणीस हे श्रीमंताजवळ होते. ते **रामराया**कडील बोलण्यांत होते. ते नानाजवळ गेले. संदा तारखा करावयास दिल्या. त्र्यंबकराव परचुरेही नानाजवळ बसले होते. इतकियात बजाबा नानासी बोलले जे. **लक्ष्मणराव चिटनिवीस** याचें म्हणणे आहे कीं, सारांश गैर वाका समजोन जाला आहे. याची चौकशी करावी. नंतर जे करणें ते करावे मधी संदा पत्रें कांहींएक चिटणीस प्रकरणा पै॥ कांहींएक होऊ नये. इतकें ह्मणतांच नानानीं तेरीख करावयास लेखणी हातीं घेतली होती. ते खाली ठेविली. आणि त्र्यंबकराव परचुरे यांस बोलले जे. तुम्ही चौकशीं न करितां सारांश केला. **लक्ष्मणराव चिटणिवीस** याचें बोलणें सारांश खोटा असें पडते. त्यापक्षीं सारांश बज्याबाकडे पाठऊन द्यावा. त्या उभयतास ताकीद करावी. कीं, बज्याबाकडे जाऊन बज्याबा चौकसी करून सांगतील तसें उभयतां **चिटनिवीसानीं** चालावे. बज्याबासही सांगितलें जे. चौकसीं करून मजला समजवावे. नंतर जें करणें तें करूं. याप्रमाणें परवानगी फिरून बज्याबाकडे मनास आणावयाची जाली. त्याही हा सारांश खरा आहे. तर नानानीं फिरून मनास आणावयास का सांगते! ते वेळेस सखोबा साने बोलले जे. **रामराव** याणीं सातसें रुपयाचा गांव पुण्याजवळ **विंझर** ह्मणून आहे. तो दरबारे खर्चीत देतो. असा करार माझे विद्यमानें **रामराव** याणीं केला आहे. त्यासी माझा करार आहे. नानाच्या तारखा संदावर करून आणीन, नंतर तुम्ही नानाचें नांवची खासगत सनद गांव तुम्हांस दिल्हा आसीं व गावांस सनद करून देतो. आसा करार त्याचा आहे. त्यांस आपण

संदावर तारखा करून द्याव्या. मी ह्या तारखा **रामराव** यांस दाखवितों, आणि गांवच्या सनदा करून घेतो. असें ह्मणाले. वरून नानाचा कारभार गांव आपणास येणार संदावर तारखा गांवच्या लोभानीं करून दिल्या; परंतु सखोपंत यांस ताकीद केली जे. **रामराव** यांस संदा दाखवून गांवची सनद करून घेणें, परंतु सरकारी संदा **रामरायास** द्यावयाच्या नाहींत. तुम्ही आपल्याजवळ आसो देणें. परवानगी खेरीज एकंदर न देणें. संदावर सिके कांहीं जाले नाहींत. बज्याबा मनास आणतील, नंतर वाजवी आसेल तसें करूं. याप्रमाणें ताकीद सखोपंत साने यांस केली. संदावर मजमुची निशाणी जाली नाहींत व सिकेही जाले नाहींत. **रामराव** याचें नांवाचें पत्रही जाले नाहीं. याप्रमाणें बजाबावर फिरून मनास आणण्याची परवानगी घेऊन बाळाजीपंताचा निरोप घेऊन आम्हीं फिरून लष्करांत सडे फौजेंत परशरामपंत भाऊकडे गेलो. ते समयीं बाळाजीपंत सहस्त्रबुधे बोलले जे. मी नानाचें कानावर घालतो. नंतर आम्हीं लष्करांत गेलो व बाळाजीपंतानीं नानाचें कानावर घातले. नानाचें उत्तर जाले जे. बज्याबा सिरवलकर याजकडे उभयतां **चिटनिवीस** याचें मनास आणावयास सांगितले आहे. **लक्ष्मणरावभाऊ चिटनिवीस** याणीं बज्याबा सिरवलकर याजकडे यावे. ह्मणजे ते मनास आणतील, ह्मणून पत्र बाळाजीपंत याणीं सडे फौजेंत पाठविले जे. **लक्ष्मणरावभाऊ चिटनिवीस** यांस बज्याबा सिरवलकर याजकडे मनास आणण्याची परवानगी नानाचीं जाली आहे. याजकरितां **लक्ष्मणरावभाऊ चिटनिवीस** यांस बज्याबाकडे पाठवावे. वाजवी मनास आणणे ह्मणून जाली आहे. ते पत्रच भाऊनीं आम्हास दाखविले. त्या पत्राची नकल आम्हीं करून घेतली. ते हाली आह्मांपासी आहे. आणि परशरामपंत भाऊ याणीं सांगितलें. **रामराव** याच्या सारांशाची चौकसी करण्याविसी खरेखोटेपणा कोण्हीकडे हे करणार. बज्याबा सिरवळकर याजकडे परवानगी जाली आहे. तुम्हीं पुढील लष्करांत जावे. **श्रीमंत** खासा होते, तेथें जावे. त्याजवरून तीर्थरूप व आम्हीं निघोन बज्याबा सिरवळकर याजकडे आलो. लष्करे पुण्यास जाण्यास माघारी फिरली. मशरुनमुलूक बज्याबाचें स्वाधीन होते. दरमजल लष्कर पुण्यास जाण्यामुळें बोलण्याची गांठ कांहीं पडली नाहीं. असें करितां पुण्यास स्वारी आली. बज्याबानीं मनास आणावे. तो सरंजामपटी सरकारांतून जाली. आह्मांकडेही सरंजामपटीचा चोपन हजाराचा ठराव जाला. त्या घोरामुळें मुतालकी संबंधाचें

बोलण्यास गांठ **रामराव** याणीं कांहीं पडूं दिल्ही नाहीं. पुढें श्रीमंत कैलासवासी रावसाहेबाचा काळ जाला, मगतर सारेच राहिले. दरबारी आम्हीं राहत होतो; ते **रामराव** याच चिरंजीव **मलारीराव** राहूं लागलें. आम्हीं पुण्यांत दरबारीं राहावें, तरी हजारो रुपये खर्च लागणार, तेव्हां घरीं राहिलो. ते वेळेस **रामराव** याणीं डौल घालून पुण्यांत राहून दरबारची वैहिवाट करू लागले. आह्मीं वेगळें जाऊन रहावे तर, आमचा आंश थोडा, ह्मणोन घरी राहिलो. तों पुढें सरंजामच सरकारांतून जत्फ जाला. तेव्हां खावे काय? कसें जाऊन रहावे? या प्रमाणें प्रसंग काळवशे करून प्राप्त होऊन देशांतरास उदरनिर्वाहार्थ जाणें प्राप्त जाले. मुतालकी संबंधे संदापत्रें वगैरे कांहीं एक **रामराव** याचें हाती आलीच नाहींत. परंतु सखोबा साने दरबार खर्च खाऊन **रामराव** याचें पत्यावर पुर्तेपणें होते. याजमुळें एकताकीद चिटनिविसीची. त्यांत लिहीला आहे, मजकूर **लक्ष्मणराव गोविंदराव** याणीं समजाविल जे. मुतालकीचे सरंजामाची व मुतालकाची तगिरीबाहाली सरकारची असें समजाऊ. मुतालकी करून घेतली. त्यांस ते गैर वाका सरकारांत **रामराव** याणीं समजाविले जे. मुतालीक व मुतालकाचे सरंजामाचीं तगेरी बाहाली स कारांतून करावयाची नाहीं. **रामराव** व * * मुतालीक करणें तो करावा. असें सरकारांत गैरवाक समजाविले. आणि आसीच सरकारची ताकीद घेतली आहे. हजारो रु॥ दरबार खर्च खाणारांनीं खाला. आणि काम सेवटास न गेले. संदापत्रें कांहीं एक हातास न आली. त्यापक्षीं एक चिटनिवीसी ताकीद मात्र मोठे रदबूदलीनें देवविली असेलसें वाटते. कारण, बजाबा सिरवलकर याजकडे मनास अणावयास सांगितले. त्यास च्यार दिवस लागतील. **रामराव** याचें कांहींच आपण न केले. असें दिसते. ह्मणून ताकीद सदरहू प्रमाणें देवविली असें वाटते. जर संदा जाल्या आसत्या तर ताकीदीचें कारण नव्हते. सदरहू ताकीद घेतली आहे. तरी त्यांत तहगिरी बहाली मुतालकाची **रामराव** याणीं करावी. असें सरकारास समजाऊन करून घेतली आहे. तीच खरी करून द्यावी, किंवा आम्हीं याची तगैरी बाहाली नाहीं. सरकारचें हुजूर वस्त्राचा मुतालीक **रामराव** याच तगिरी बाहाली एकंदर नाहीं. असें मजमूकडील दप्तरचे दाखल्या सुधा खरे करून देतो. सातारियाहून सारा कारभार पुण्यास **नानासाहेब पेशवे** याजपासी आला. तें (स)मयीं **नानासाहेब पेशवे** याणीं **गोविंदराव बावा** यास कराराची यादी चालविण्याविर्सी व सरकारासी कसे चालावे

भोर

येविसीं करून दिल्हे आहे. ती **गोविंदराव बावाचेच** नांवाची आहे. ती याद **महिपतरावदादा चिटनिवीस** याचें हातचे कलम बंदिची व कैलासवासी भाऊसाहेब यांचे हातची मखलासी नानासाहेब याचे हातचे करार व शफतेच्या दुर्वा दिल्या आहेत. त्यांहीं **गोविंदराव बावा** यासच दिल्या आहेत. व पेशवे सरकारची सेवा एकनिष्ठेनें केली, व **रामराव** याचेंही कबजपणापासून पालण कसें केले. हें जर कोण्ही कृपावंत होऊन चौकसीं करितात. असें जाल्यास नजरेस येईल. वर घरांत वडील बंधुचे चिरंजीव ह्मणून वडील ते आहेतच, परंतु **मलारीराव** याचें बापानीं आज्यानीं कोठे माहाराजा- पासीं किंवा पेशवे सरकाराची सेवा केलीच नाहीं. वालीचे वडील मात्र काय मेळविले, ते **बाळाजी आवजी** याचे पाठीमागें **खंडो बलाळ** याणीं मिळविले. ते **खंडो बलाळ** त्याचें व आमच्या आज्याचें तीर्थरूप त्याचें मागें कायजे मेळविले. तें **गोविंदराव बावानीं** मेळविले. एक चिटनिसी मात्र **बाळाजी बावा** याणीं मेळविली. वरकड त्या आलिकडे गांव जमिनी **राजारामसाहेब सिवाजी महाराजाचे** कनिष्ट पुत्र **ताराबाई साहेबाचे भ्रतार** यांचें कारकिर्दिपासून, कोणांस गांव जमिनी देणें त्या दिल्या. पूर्वी **सिवाजी** राज्याचे वेळेस सरंजाम गांव जमिनी कोणासच नव्हत्या. कार(ण) राज्य स्वस्थ एका जागीं बसून करण्याचाच विचार. याजमुळें न दिल्या. **राजाराम साहेबा**च्या वेळेंस कांहीं स्वस्थ जाले. त्या वेळे कोण्हास कांहीं देणें ते योग्यतेनसार दिल्हे. त्यांत आमचें वडील **खंडो बलाळ** यांसही चिटनिवीसी गांव खेडी थोडींबहुत लाऊन दिल्ही. त्या आलिकडे कैलासवासी शाहू महाराज याजपासी **गोविंदराव बावानी** सेवा केली या. कांहीं ते समयीं सरंजाम दिल्हा. दुसरे कोण्ही कांहीं मेळविले नाहीं. येविसीं आंती चौकसी सरकार कृपावंत होऊन वाका समजोन घेतला, आणि दाखला विचारल्यास सर्व श्रीमंताचे राज्य साक्ष देईल. चौकसी करणें ती मात्र चांगली करावी. **गोविंदराव बावानीं** श्रम किती केले सर्व राज्यास माहीतगिरी आहे. याखेरीज मौजे निमणीं प्र॥ मिरज हा गांव **जिवाजी खंडेराव** वारल्या- नंतर सिवाजी थोरात वाळवेकर यास प्र॥ वावळे येथील देस चौगुळीचे वतन सरकारांतून करून राजश्री स्वामीकडून देवविले. त्या थोरांत आणि दरबार खर्चात **गोविंदराव बावा** यासीं मौजे निमणी हा गांव आपले तर्फेचा निमे दरो-

अ ११/८७

 17 JAN 1994

बस्त करून दिल्हा. व निमे गांव राहिला. तो मिरजेचा किला हुजूर माहाराजाकडे होता. सरकार तर्फेनें डुबल ह्मणून म्हराठे होते. त्याजकडे होता. डुबलाची काम काजें दरबारी पडत होती. ती **गोविंदराव बावा** करीत होते. सबब डुबलानींही आपले तर्फेचा निमे गांव दरबार खर्चात **गोविंदराव बावास** दरोबस्त करून दिल्हा व मौजे माजगांव क॥ तलबीड प्रा॥ पनाला हा गांव सरंजामाचें अगोदरचा आजमासें सवासें दीडसे वर्षें होत आली असतील इनाम आहे. आणि चौहू जागा सारख्या वाटणीस आहे. हाली चौघांची सारखी यांटणी चालली आहे. निमणी हा गांव चिटनिविसीचे सरंजाम ह्मणून ह्मणतात. आणि **जिवाजी बावाचे** मागें गांव मेळविला, तो **रामराव** चिटणिसी-कडील ह्मणून वैहिवाट करितात, तेव्हां एकच निश्चये कोठे होतो? असे कां ह्मणून विचारिलें, तर रावसाहेबी आह्मांकडे लाविला ह्मणतात. याचें स्वार्थावर पडेल. त्यांस असें ह्मणावे आणि इनाम वतनें चौहू जागीं सारखे असा लेख असता नवीन वडीलकीचा सिक्याचा वांटा काढावा ह्मणतात. सिक्यास वाटा काढणें तर रावसाहेबी वांटणीं समजूत केली. त्या समयींच वडील वाटा करून घ्यावा होता. ते न करितां नवीन वडीलकीचा वाटा काढावा. असे योजना करितात. आम्हीं कांहीं बोललो तर रावसाहेबाचें केल्या खेरीज बोलूं नये. आणि यांच्या स्वार्थाचा वडील वाटा मागें काढणार येविसीं कोण्ही कांहीं नाहीं. ह्मटल. आता द्वेष करावा. आसीं चाल एक रावसाहेबीचें केले. त्याजवर नवें कांहीं एक न करावें. तरी कोठें आंहे. मौजे धामणेरे त॥ कोरेगांव प्रा॥ वाई येथील जुना मोकासा व जुनां रमणा ह्मणून जमीन आहे. ती त्याजकडे जुने सरंजामास आसावी. ते एकीकडे ठेऊन नवीन रमण्या पै॥ जमीन आहे तीसुद्धां राव वैहिवाट करितात. बाकी धामणेर **साडेतीन वाटण्या** आसी वैहिवाट चालली आहे. मौजे खोजेवाडी येथील मुतालकीचा ऐवज आहे. तो जुना सरंजाम ह्मणून चिटनिविसीकडे लाविला आहे. बाकी **साडेतीन वाटण्या** इनाम चौहू जागीं. आसे, वाटणींत लिहिले आहे. असें असोन बोरगांव इनाम, इनामपत्र **एकटे गोविंदराव बावाचे** नांवाचें त्यांत इतर भावास संबंध नाहीं आसा आहे. साहेब यांची सनद आहे. त्यांत लिहीले आहे. आसे आसोन निमे गांव चिटनिवीसीकडे वैहिवाटतात. निमेगांवांत साडेतीन वाटण्या. तेव्हां इनाम चौहू जागी असे. एक गांवी इनाम असो आर्धा चिटनिवीसीकडे आर्धे वागतात. साडेतीन वाटण्या केले.

17 JAN 1994

तेव्हां खास वाटण्या जाल्या, किंवा कसें हें पहावें. राजश्री स्वामी यांचे दप्तरीं चौकसीं करून **रामराव** यांस देणें तर द्यावे. वरकड घरचीं समजूत कळेल. त्या रितीनें करून दिवस काढले. यांत तारोतार वाटणीचा आर्थ आहे, नाहीं, हे धणी आसेल त्यांणीं ध्यानांत आणावें. तेही नाहीं. घरिची वेहिवाट या प्रकारें करितात. श्रीमंतांचे दप्तरीं दाखला पाहावा. तरी तैनात जाबता व बेवारा आहे. तेथें मोघम बेरजा लाविल्या आहेत. येळापूर बोरगांव प॥ येलापूर बहुता दिवसांचा गांव मान्याकडून दरबार खर्चांत होता. तो मधी पांच पंचवीस वष चालत नव्हता. मोकासा तो हाली चालता जाला आहे. तो आमचें वडीलकीचा ह्मणून वेहिवाट करितात. असें व्यवहार चालले आहेत. जुना सरंजाम ह्मणून पधंरा हजारांचा ह्मणून समजुतीचें यादीवर मोघम आंकडा घातला आहे. परंतु आमुक गांव किंवा इनाम किंवा जमीन आसी लाविली नाहीं. व खेरीज **गोविंदराव बावा** याचें हातचीं निराळी यादी नाहीं **रामराव जिवाजी** याजपासीं असें आसोन **रामराव** याचें मनास येईल, आणि चांगलें निर्वेध असें गांव खेडीं ते चिटनिवीसीं कडील ह्मणून घ्यावे. आणि आंह्मीं सर्वांनीं उगेच पहावे. ऐकावे. तें कां ? व हे वाटणी केली. हे घरीं समजूत केली. ते **गोविंदराव बावा** करावयास गेले एक आणि आता जाले एक, आसे आहे. वरकड आह्मीं आह्मांस विचारिले वेळेस ह्मणत गेले. हें करणें सारे तुह्मां करितां केले आहे. तुह्मीं त्यासीं लागून असावे. ह्मणजे **रामराव** तुह्मांस वेगळे मानणार नाहीं; परंतु त्याजपासीं दस्ताऐवज जाला. आह्मासी तोंडांनीं बोलत गेले, आम्हींही जितकी **रामराव** याची मर्यादा करणें ती करितच गेलो. परंतु त्याचें मनासच न आले. दूर धरितच चालले. तेथें आम्हीं लागून कोठ पर्यंत राहावे. वांटणी खास वाजबी जाली. आसे आम्हीं मान्य कधीं होऊं जे. **राजश्री स्वामी** याणीं वांटणीं करून द्यावी. आणि राजश्रीनीं आह्मां सर्वांस चिटनिविसी संबंध नाहीं एकटे **रामराव** याचें चिरंजीव यासच चिटनिविसी दिल्ही. असें ह्मटल्यास आम्हीं ऐकू. श्रीमंत कैलासवासी **रामराजे** यांचे चिरंजीव **श्रीमंत** कैलासवासी **शाहू महाराज** हाली **श्रीमंत राजश्री छत्रपति स्वामी** आहेत. याचें तीर्थरूप याजपासीं **रामराव** व **मल्हारी राव** सन चे साली मोकळे होऊन किले सातारा व शाहूनगरची वेहिवाट करित होते. ते समयीं उभयतां सातारियास जाऊन बोलणें श्रीमंत **कैलासवासी माहाराजा** जवळ मोठ्याचें विद्यमानें घेतले जे. चिटनिविसींचा सरंजाम पंधराहजाराचा आहे.

व चिटनिविसीचे धंद्यांत **रामराव** याचें वरकड सर्व भावाबंदास चिटनिसीचें धंद्यांत व सरंजामांत पंधराहाजारांत संबंध नाहीं. आसीं राजपत्रें करून द्यावी. आसी आमचें घरची वाटणीहि **गोविंदराव बावा** याणीं करून दिल्हीच आहे. त्या प्रमाणें स्वामिनिही कृपाकरून राजपत्रें करून द्यावी. आसें बोलणें घातले. मध्यस्ताचें विद्यमानें, तेव्हां श्रीमंत कैलासवासी **माहाराज** याणीं मध्यस्तापासी उत्तर केले जे. चिटनिविस याचे वडिलानीं चिटनिवींसीचा धंदा आमचें वडिल **सिवाजी माहाराज**पासीं **बाळाजी आवजी** ह्मणून होते. त्याणीं मेळविली. **माहाराजानीं** त्या दिवसांपासून आजपर्यंत चालविली. असें असोन, त्या **बाळाजी आवजी**चा वंश च्याळीस पंनास पुरुष विस्तार आहे. तितके माझे चिटनिवीस आज मी जे काम करावयास सांगेन तिकडे प॥ ते काम करावयाजोगे, आथवा जेथे मारवीन तेथें मरावयास तयार आहेत. व यामागेंही सरकार कामावर आले आहेत. हें वर्तमान सर्व माझें पकेपणें वडिलांचे मुखें ऐकिले आहे. त्यापक्षीं एकट्या **रामराव** यासच चिटनिसी दिल्ही व सरंजाम याची राजपत्रें करून द्यावी. असें तुम्ही सांगता ते कांहीं स्पष्ट द्यावयाचे नाहींत. **गोविंदराव बावा** याणीं घरीं वाटण्या केल्या त्यांत वरकड भावांस चिटनिविसीचें धंद्यासी व सरंजामासीं संबंध नाहीं, असें केलें आहे. ह्मणून **रामराव** ह्मणतात. त्यांस **गोविंदराव** याणीं वांटणीं घरीं केली असेल, ती आह्मांस कांहीं एक मंजूर नाहीं, आम्हीं वांटण्या चिटनिसाच्या हुजूर करून देऊं, त्या प्रों सर्वांनीं चालावे. हाली **रघुनाथराव चिटनिवीस** आम्हीं सरकारी ऐवजाचें कामाकरितां, **रघोजी भोंसले** याजकडे पाठविले आहेत. त्यांस आम्हीं आज काय पेशवाई बुडविली आणि आमचें हती सर्व आले आहे. असें कोठें आले; परंतु **रघुनाथराव** यांस रवाना केले. तेही गेले. कांहीं एक मागे पुढें आंदेशा देखील केला नाहीं. जर आम्हीं केला कारभार, सेंवटास गेल्यास उत्तम नाहीं तर **रघुनाथराव चिटनिवीस** याचा व त्यांचें कुटूंबाची गती काय होईल? तेव्हां माझें हाते **रघुनाथराव** याचा व त्यांचे कुटूंबाचा समाचार तरी घ्यावयास घडावा. याचें आहे किंवा नाहीं, याचा विचार तुम्हींच करावा. व आणखी त्याचें घरांतील पुरुष आहेत. तेही आसीच कामें करणार व मूळ पुरुष सर्व **चिटनिविसाचा बाळाजी आवजी** असतां आसी **रामराव** याचें आवडते ह्मणण्याप्रमाणें आम्हीं राजपत्रें करून द्यावयाची नाहींत. आतां ते गैर समजुती आपले स्वार्थावर

दिष्ट ठेऊन ह्मणतात. त्यांस इतकेंच तूर्त सांगावें जे. तुह्मास हाली चार कामें काजे सांगितली आहेत. ती करून यावी. कांहीं सरकार चाकरी केलीसी करावी. नंतर करणें न करणें याचा जाबसाल सांगावयास येईल. असें मध्यस्तापासीं सांगून **रामराया**सीं सदरहूप्रमाणें बोलविले. वेळ टाळली. आसी बोलणीं त्या मध्यस्तापासीं जाली. पुढें सातारियावर रास्ते व परशरामपंतभाऊ जाऊन राजश्रीकडील फौजेची व रास्ते पटवर्ध(न) याजकडील फौजे(ची) लढाई होऊ लागली. त्यासमयीं किले सातारियाचें तटाचें **हणमंत बुरजावर माहाराज** बसले होते. तेथे **रामराया**कडील मध्यस्तही जवळ बसले होते. त्यांस महाराज बोलले जे. **रघुनाथराव चिटनिवीस** यांस आम्हीं नागपुरास पाठविले. त्याची गती काय या समयीं होईल? तुम्हीं **रामरायास** राजपत्रें करून द्यावी ह्मणत होता. आसी माणसे आमचें वडीलाचें वेळेची पांचपंनास आहेत. त्यांस मी आपले नव्हे ह्मणावे? आणि आम्ही आपले वडिलांचें करण्यास बटा लावावा. याजकरितां राजपत्रें कांहीं चिटनिविसी संमधे सर्वांस संबंध नाहीं, आणि **रामराव**च आधिकारी चिटनिविसीचें असें करून द्यावयाचें नाहीं. **गोविंदराव बावानीं** घरातले घरांत चालीची वाट * * * * माणेच सरकारांतून करावयाचें नाहीं. मुतसदी याजकडे संबदें सरकारचें याची वाटणीं अगर हरएक सांगणें ते हुजूर आणोन सांगावे. याचें पेशजी आम्हीं तुह्मांस सांगितलेंच होते, कीं **रघुनाथराव** यांस पाठविले ते कांहीं एक आंदेशा न करितां आमचीं आज्ञा सीरोधार्ये ह्मणून गेले. त्यांस हा समय अडचणीचा कसा पडेल. हे सर्व तुमचें ध्यानांतच आहे. ही बोलणीं जाली. तुह्मावर **माहाराजांची** कृपा बहुत आहे. असें वर्तमान सविस्तर **रामराया**कडील मध्यस्त माहाराजाजवळ बोलत होते. त्याणींच आह्मांस कचे वर्तमान सांगितले. परंतु त्या मध्यस्ताचे नांव लिहीता नये. हाली ते वर्तमान आहेत. यासिवाय मुतालकीसंबंधीं सारंश करून घेतला. त्या समयीं च्यार रुपये खर्चही जाला होता. सखोबा साने मध्यस्त, त्याजकडून च्यार कामें उलगडावयाची ते यादितही चिटनिविसीचा सरंजाम पंधरा हजारांचा आमच वांटणीचा, भावाबंदाखेरीज करू(न) आहे. त्याची पत्रें **श्रीमंतानीं** गांव-गना व नांवाची सनद करून द्यावी.. असा उद्योग करीत होते. तेव्हां **हैबतराव भैरव** आमचें चुलते त्याजपासीं होते. त्याचें दृष्टीस ती याद पडली. मग त्याणीं साफ सांगितले कीं हें करणें तुम्ही काय करिता? असें आम्हीं होउं देणार नाहीं,

ह्मणतांच त्याचें त्यांचें वांकडे पडले. त्याचे चिरंजीव हाली **मैराळ हैबतराव** आहेत. त्यांस विचारावे. ते सांगतील. असें **हैबतराव** यांस ह्मणावयास कारण काय? जर वांटणी खचित जाली आणि चिटणिवीसीचा सरंजाम व चिटणिवीस यांजकडे खास, कोणांस संबध नाहीं. असे रावसाहेबी केले आसते तर मग **हैबतरावही** पत्र आम्हीं होऊन देणार नाहीं, ह्मणून कशास बोलते. याजवरून पाहाणारांनीं मनास आणावे, ह्मणजे सर्व समजेल. **रामराव** यार्णी सर्व कपटे करून एक एक साधन पाडीत गेले. त्यांत जे साधन साधले त्याची सिधी मानितात. जे न साधले ते खर्च होऊन आपले मनांत काळ प्रतिक्षा करितात, परंतु मुख्यर्थ हे आप्तपरकीपणा, आपले स्वार्थापुढें कांहीं एक मनास आणावयाचे माणूस नव्हे. याजकरि(तां) कोण्ही कृपा करणार, श्रीमंत जाला तर त्यास विनंती करून वांटणी खास वाजबीच करून घ्यावी. त्यांत जसीं सांगतील तसें चालावे. परस्परांनीं दाबऊन करावे. आपण ऐकावे आसें सर्वथैव नसावें.

सदरहू वर्तमान वडिलाचे तोंडे ऐकिले व वैवाटी करून पाहिले केले. त्याजवरून लिहीले आहे. हस्त अक्षर रघुनाथराव लक्ष्मण खुद.

**नंबर २१** श्री.

**महिपतराव चिटणीस** व **गोविंदराव चिटणीस** याचा वतनाचा कजिया व घरांतील वाटयाचा कजिया आहे. त्या वाजबी मनास आणून करावे. हुजूर आल्यास वाजबी असेल ते करावे येणेंप्रो करार.
छ १८ रबिलाकर कार्तिक
सन सलास सीतैन.

---

**नंबर २२** श्री मार्तंड.

रा॥ **बळवंतराव मल्हार चिटणवीस** व समस्त भाऊपणा याचा वाटणीचा तंटा पडल्यावरून **प्रतापसिंह महाराज** याजकडे फिर्याद भाऊपणाची गेले वरून माहाराज यार्णी पंच नेमून **बळवंतराव मल्हार** व समस्त भाऊपण याचे राजिनामे लिहून घेऊन जामीनहि घेतले. नंतर चौकसीस सुरवात शके १७४५ सात केली. ते समयीं पूर्वी जालेली वाटणीची याद **बळवंतराव मल्हार चिटणवीस** यार्णे पंचापुढें हजर केली. ती यादीची कलमे १२ एकंदर जमा करून घेऊन विचार करण्यास सुरवात केली ती बी॥

१ यादी करार वाटणीचा सु॥ समान सीतेन मयाव आलफ खेरीज जमा जाली. आजमासे जमा रुपये ६०००० पै॥ वजा चिटणवीसीचा सरंजाम गांव खेडी रामराव जिवाजी चिटणीस याजकडे जुना खाशाचे वेळची बेरीज रुपये १५००० यासी तपशील गांवगना व परगणे जुन्या सरंजामाचे आहेत. ते लावावे. त्याचा तोटा नफा त्याचा त्याजकडे दुसरे याकडे संबंध नाहीं.

बाकी बेरीज रुपये ४५,०००

यासी वाटण्या भाऊपणे याच्या साडेतीन

| | |
|---|---|
| १ रामराव जिवाजी | १२८५७ |
| १ खंडेराव बापुजी | १२८५७ |
| १ लक्ष्मणराव गोविंद | १२८५७ |
| ॥ बाबुराव खंडेराव | ६४२९ |
| | ४५००० |

ब ११
८८

## तपशील.

रामराव जिवाजी वाटा एक बेरीज १२८५७ रुपये

लक्ष्मणराव गोविंद वाटा एक १२८५७ रुपये

खंडेराव बापुजी वाटा एक बेरीज १२८५७ रुपये

बाबुराव खंडेराव वाटा एक ६४२९ रुपये.

वाटण्या साडेतीन बेरीज रुपये ४५०००

या खेरीज कलमे.

## वतने व इनाम गांव.

सरदेशमुखी प्र॥ चेऊल येथील हाकाचे उत्पन्न होईल त्या पो **महिपतराव** व **मोरोबा** यांचे विभाग जाऊन बाकी राहिले ते चौघानी घ्यावे कलम १.

इनाम निगडी येथील जमीन आहे त्याचे उत्पन्न होईल ते चौघानी घ्यावे कलम १.

नाडगोडी प्र॥ पनाळा येथील हक उत्पन्न होईल ते चौघानी घ्यावे कलम १

### इनाम गांव.

१ जैतापूर त॥ सातारा.

१ माजगांव कर्यात तळबीड.

१ वडगांव वाघमारे प्रांत कऱ्हाड.

--

३

याचे उत्पन्न होईल तें चौघांनीं घ्यावे. कलम १

एकूण वतनी कलमे च्यार करार चौघानीं समभागे करून वाटून घ्यावे. कर्ज आजपर्यंत थोरले व जैतापूर व वडगांव रासाई व वडगांव वागमारे येथील जे आहे ते जमेचे स्वारी खर्च व सरंजाम गांवखेडीं राखावयास खर्च पडेल तो सरासरी ऐवजावर वाटून घ्यावे. बेरजेवर हिसे बरहुकूम बसऊन वाटून घेऊन भरावे. कलम १

येणेप्रमाणें कलमे आकरा केली आसत वाटणी हिसे ४५ लिहिले; परंतु जासती कसर होईल ते साडे तीन विभागावरी वांटून घेयावी. या प्रो चौघानी वर्तून एकोप्यानें चालावे आंतर न करावे.

सदरहूप्रमाणें रामराव जीवाजी मान्य.

सदरहूप्रमाणें खंडेराव बापूजी मान्य.

सदरहूप्रमाणें लक्ष्मण गोविंद मान्य.

सदरहूप्रमाणें बाबूराव खंडेराव मान्य.

उभयतानी दोलतीत श्रम बहुत केले. सबब रामराव याचे नांवे सरमजामाचा वाटा होता. त्याज पे॥ आपा व लक्ष्मणराव यास सु॥ साबान मया आलफ दिल्हा वाटा '।' पाव. कलमे.

एकूण पेशजीची कलमे आकरा व हालीचे कलम एक एकूण कलमे बारा.

---

**नंबर २३.** श्री

यादी करार येणे प्रमाणे सु॥ सलास सलासीन मयातैन व आलफ शके १७५४ नंदनाम संवत्सरे.

१७१ जमा एकंदर खासगत.

८५ मौजे वडगांव.
१६ जैतापूर.
३६ बोरगांव सेते.
३४ नाडगौड
—
१७१

खर्च.

खासगत खर्च.

| | |
|---|---|
| २५ वडगांव. | ६० घरांतील खर्च. |
| १६ जैतापूर. | ६० मौजे वडगांव पैकीं. |
| ३४ नाडगौडी | ० लग. |
| ३६ बोरगांव | — |
| — | ६० |
| १११ | — |
| | ६० |

—
१७१

येणेंप्रमाणें नेमणूक पावणें आह्मापासी राहावे हे नीटच नाहींपेक्षां ती॥ राजश्री आपासाहे(ब) किंवा चिरंजीव राजश्री बाळासाहेब आथवा सिताराम बावापासी राहिलेस नेमणूक पावेल. विभक्त जालेस ती॥ राजश्री आपास॥ उभयानी सही सिका करण्यास वडील त्याचेपासी उभयतानीं राहावे. आम्ही राहतो इतक्यावरही मर्जी आसेल तसे करू.

नंबर. २४ श्री

यादी **भगवंतराव लक्ष्मण** व **शामराव आवजी** याचा ऐवज चिटणीस सातारकर याजकडे वंता वरून तालुके उंदेरी येथील सरदेशमुखीवर येणे त्या विसी हिसेबाचे लढे पडून त्याचे निवाड्याकरितां सावकार मशारनिल्हे व दाजी गोपाळ कारकून नि॥ चिटणीसीचे वतंदार हें संस्थान कुलाबा येथे सरकारांत आले. त्यावरून वतंदार याणीं व सावकार मशारनिल्हेनी वहिवाट कसी चालावी तो निर्णय ठरला. तो येणें प्रमाणे सु० खमस हशेरीन मयातेन व आलफ.

१ भिवराव मनोहर व गोपाळराव भगवंत चिटणीस सातारकर याजकडे भगवंतराव लक्ष्मण व शामराव आवजी याचे विद्यमान तालुके उंदेरी येथील सरदेशमुखीचे मशारनिल्हेचे आठवे हिशावर येणे.

२०१३। बराखत शके १७१२

१५१३। प्रा॥ खत एक

५०० प्रा॥ खत एक

————

२०१३।

२०० बरापत्र दाजी गो × × × गाचे मिती माघ शुद्ध शके १७४५

३१४॥॥. इ॥ शके १७२९ त॥ शके मजकूर परयंत येणें.

२५२८.

येकून दोन हाजार पांचशे आठावीस या ऐवजीं रदकर्जी पावती जाली ती व वतन पावले ते वजा जाऊन भगवंतराव व शामराव यांस चिटणीस मशार निल्हेचे दस्ताऐवजा अनवये देणें याचा ऐवज निघाला. विद्यमान दाजी गोपाळ नि॥ चिटणीस. ४५००रु॥

सदरहू पंचेतालीससे रु॥ चिटणीस याणी देणें त्याचा कराराप्रमाणें व्याजसुद्धां फडशा होई तोपरयंत तालुके म॥र एथील सरदेशमुखीचा हिसा चिटणीस याही भगवंतराव व शामराव याजकडे देत जावा. आसमानी सुलतानी व॥ कारणांनीं उंदेरीचा ऐवज ज्यासाली हातीं आला, त्या साली रत्नागिरी व॥ हरएक ऐवज या वतंदार चिटणीस याचे ऐवजी घ्यावा.

१ ठराव हिसा **बळवंतराव मल्हार चिटणीस** सातारकर तर्फ श्रीगांव प्रांत चेऊल येथें चिटणीस यांचे इनामगांव मौजे कुरकुंडी व कोलटेभी व सरदेशमुखीचे वतन तालुके उंदेरी पै॥ आ * * याचे अ×जावर भाऊबंदीत तंटा व सावकाराचा तंटा पडोन गावचा वसूल अमानत जाला. त्याजवरून **बळवंतराव** याचे हिशाविसी सरकारांत तपासनीस होऊन ठराव जाला येणेप्रमाणें.

१ भाऊबंद याचा तंटा ऐवज घेण्याबद्दल बळवंत याचे ताबा असल्यास सावकाराचा ऐवज सन खमास ईशारीन आखेर परयंत या ऐवजाच्या भरंशावर **बळवंतराव** याणी घेतला. त्याचा निर्गम जाल्यावांचून या वत(ना)वर भाऊबंदानीं तंटा करू नये व **बळवंतराव** व त्याचे हिशांतील भाऊबंद याणीं तंटा करू नये.

५६११। माधवराव लक्ष्मण व॥ किहीम.

४८११ तालुके उंदेरीचे सरदेशमुखींवर ब॥ हिशेब मखलासीचा सुमतीसा आशार शके १७४० त॥ शके १७४७ सन मा॥र मि॥ जेष्ट शु॥ व्याजसुधां

८००। यशवंतराव मैराळ चिटणीस याचा हिसा वहिवाटीस माधवराव लक्ष्मण याजकडे होता. त्या पै॥ बळवंतराव याचे खात्यास ऐवज जमा करून राहिला ऐवज फाजिल उतरला त्यावर बळवंतराव याचा दस्ताऐवज करून घेतला, परंतु येशवंतराव याचा व माधवराव लक्ष्मण याचा हिशेब + + + + + +दिल्ही नाहीं. **बळवंतराव** याचा व आमचा संबंध वेगळा ठरल्यामुळ **बळवंतराव** याचे खात्यास ल्याहावे ठरलें ते पुणे चाल रु॥

५००। मुदल पुणेचाल.
३०० व्याज.

८००।

५६११।

सदहू ऐवजात मौजे कुरकुंडी व कोलटंभी
येथील चौथाई ब॥ चा हिसा व उंदेरीचे
वतनाचा चौथाई वंता पै॥ निमे हिसा.

४७८७॥ भगवंतराव लक्ष्मण मुगांवकर याचा ऐवज
उंदेरी येथे सरदेशमुखीच्या वतनाचे ऐवज
वर येणें.

३५६२॥ ऐन बळवंतराव याचे समजुतीचे
दस्ताऐवज वरून बा॥ हिशेब पुणे
चाल रु॥ ३५६२॥.

१२२५ येशवंतराव नारायण व रावजी
विश्वनाथ या * * * * न
घेतले पर * * चे हिशेबाचे
फडशा समई हे रु॥ बळवंतराव
याचे हिशावर घ्यावे असे सर-
कारांतून ठरले ते रु॥

८२५ येशवंतराव मैराळ पै॥
४०० रावजी विश्वनाथ पै॥

---

१२२५

---

४७८७॥

सदरहू ऐवज उंदेरीचे वतना पै॥ बळवंतराव
याचे चौथाई व॥ पै॥ निमे घ्यावे.

---

१०३९८॥।.

सदरहू ऐवज दोहो सावकाराचा येणे तो बळवंतराव
याचे करारा * * * फडशा होई तोपर्यंत जे उत्पन्न
होईल ते उभयता सावकारांनीं सदरी लिहिल्याप्रमाणें
घ्यावे. एका सावकाराचा निर्गम जाल्याने राहिला.
सावकार त्याणे सारे वतनाचे उत्पन्न घ्यावे.

---

एकूण दोन कलमाची वहिवाट सन खमस इसरीन पासून करावी.

---

२

सदरहू दोन कलमे लिहिल्याप्रमाणें वहिवाट करावी. येणेप्रमाणें करार छ १७ सफर नै सन खमस ईसरीन मयातैन अलफ उर्फ जेष्ट मास (शके १७४६) मोर्तब.

---

नंबर २५ श्री. नक्कल.

राजश्री याविराजीत राजमान्य

राजश्री कृष्णराव अनंत स्वामी गोसावी यास.

पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें वि॥ राजश्री **रामराव जिवाजी चिटणीस** दि॥ हुजरात याणे विदीत केले कीं लक्ष्मणराव गोविंद यानें गणेश रखमागंद मुतालिक लिहीणार दि॥ चिटणीस हुजरात याचे नकल झाले मध्येंच चिटणीस गैरसनदी मुतालिकाचा सरंजाम खात आहेत ह्मणून गैरवाका समजाऊन सन सिलास ती सैनात मुतालिकी व सरंजाम देह वि॥

| | |
|---|---|
| किता. | किता. |
| १ मौजे बोरगांव पे॥ सिराळे. | १ मौजे वराड ता॥ खेड प्रा॥ जुनर. |
| १ मौजे औनवाडी ता॥ सातारा. | ·॥· मौजे कारखले ता॥ सासवड. |
| — | — |
| २ | १॥ |

देहे

३॥

येकूण साडेतीन देहे येथील मोकासा व बाबतीचा अमल आपले नांवे करार करून घेतला येविसी मनास आणून पेशजी पासून मुतालिक व लिहीणार याचा मावळचा सरंजाम म॥रनिल्हेकडून दूर करून पेशजीप्रमाणे मुतालीक व

लिहीणार याचे नांवाचे सरंजाम तैनात जाबत्यांत धरल्याप्रमाणें रामराव जिवाजी चिटणीस याजकडे करार करून दिल्हा असे. तरी श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी यांस विनंतीकरून सनदा व हुजरे व ताकिदपत्र देऊन आमल बसऊन देऊन सरंजाम साडेतीन गांवचा मोकासा बाबतीचा आमल याजकडे चालविणे म॥रनिल्हे आपलेकडून वेतने देऊन मुतालीक व लिहीणार ठेवितील त्याचे हातून कामकाज घेत जाणें व लक्ष्मण गोविंद यास सनदापत्रें करून दिल्ही असतील ती माघारी घेऊन रामराव जिवाजी याजवळ देणें. आणि मुतालकी संबंधे कलमदान दिल्हे असल्यास माघारी घेऊन सरकारांत ठेवणे. जाणीजे छ ९ रमजान सु॥ खमसतीसैन मयाव आलफ बहुत काय लिहीणें हे विनंती.

पै॥ छ १० रजब सु॥ सबातीसैन. बार.

---

नंबर २६ श्री नकल.

मुतालकीसंबंधी चिटणीसी पत्र व नकला.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

राजश्री बाबुराव कृष्ण गोसावी यासी.

सेवक माधवराव प्रधान नमस्कार सु॥ खमस तीसन मयाव अलफ राजश्री रामराव जिवाजी चिटणीवीस दि॥ हुजूरात याणी विदीत केले कीं लक्ष्मणराव गोविंद याणी गणेश रघुनाथ मुतालीक लिहीणार दि॥ चिटणीस हुजरात याचे नकल जाले. मध्येंच चिटणीस गैर सनदी मुतालीकी सरंजाम खात आहेत ह्मणोन गैरवाका समजाऊन सलासतां सैनात मुतालीकी व सरंजाम देहे. बी॥.

| किता. | किता |
|---|---|
| १ मौजे बोरगांव प्रा॰ शिराळे. | १ मौजे वरुड ता॰ खेड प्रा॰ जुनर. |
| १ मौजे खेजेवाडी ता॰ सातारा. | ॰॥॰ मौजे कारखेल प्रा॰ सासवड. |
| — | — |
| २ | १॥॰ |

---

३॥

देहे.

येकूण साडेतीन देहे येथील मोकासा व बाबतीचा अमल. आपले नावें करार करून घेतला. येविसी मनास आणून पेशजीपासून मुतालीक व लिहीणार याचे नांवाचा सरंजाम आम्हीं आनभऊन आपणाकडील कारकून वतने देऊन ठेवतो. त्यास सांगतो ते काम करतात. त्या प्रों सरंजाम आमचा आम्हीं आनभऊन आपणाकडील कारकून वेतन देऊन ठेवितो. त्यांस सांगतो ते काम करितात. त्याप्रमाणें सरंजामाचा आह्माकडे करार करून दिला पाहिजे. ह्मणोन त्यावरून उभयताचे कागदपत्र व भोगवटा मनास आणिता पेशजीपासून मुतालीक व लिहीणार यांचें नावांचा सरंजाम सरकारांत समजोन चिटणीस आपण आनभऊन कारकूनास वेतने देऊन कामकाज करीत आले. पुढें सदरहू सरंजाम तीर्थरूप कैलासवासी नानासाहेब याणी सन समान खमसेनात चिटणीसाची तैनात करून दिल्हा. त्यांत धरला आहे. त्याप्रमाणें गोविंद खंडेराव याणीं घर वाटणींत धरून ज्याचे ते आनभवीत असतां लक्ष्मणराव गोविंद याणीं गणेश रखमागंद यांचे नकल झाले मध्यें चिटणीस गैरसनदी खात होते. ह्मणोन समजाऊन मुतालिकी व सरंजाम मुतालिक व लिहीणाराचे नांवचा असतां मुतालीकी संबंधे दरोबस्त सरंजाम आपले नांवे करून घेतला. तो गैरवाका. सबब आह्मांकडे करार करून दिल्हा पाहिजे. ह्मणोन त्याजवरून उभताचे कागद पत्र व भोगवटा मनास आणिता पेशजीपासून मुतालीक व लिहीणार त्याचे नांवाचा सरंजाम सरकारांत समजोन चिटणीस आपण अनभऊन कारकुनास वेतन देऊन कामकाज करित आले. पुढें सदरहू सरंजाम तीर्थस्वरूप कैलासवासी नानासाहेब याणी सनसमान खमसैनात चिटणीसाचा तैनात करून दिली त्यांत धरला आहे. त्याप्रमाणें गोविंद खंडेराव याणी घर वाटणींत धरून ज्याचे ते अनभवीत असता लक्ष्मणराव गोविंद याणी गणेश रकमांगद याचे नकल जाले मध्यें चिटणीस गैर सनदी खात होते. ह्मणोन समजाऊन मुतालिकी व सरंजाम मुतालीक व लिहीणाराचे नांवाचा असता मुतालकी संमधें दरोबस्त सरंजाम आपले नांवे करून घेतला. तो गैरवाका सबब मा॥रनिल्हे कडून दूरकरून पेशजी पै॥ मुतालिकी व लिहीणार याचे नांवाचा सरंजाम तैनात जाब त्यांत धरल्या प्रॉ रामराव जिवाजी चिटणीस याजकडे करार करून दिल्हा असे तरी **श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति** स्वामी यांस विनंती करून सनदा व हुजरे व ताकीदपत्रे देऊन आमल बसऊन देऊन सरंजाम साडेतीन गांवचा मोकासा व

बाबतीचा अमल याजकडे चालणें मा॥रनिल्हेआपले कडून वेतन देऊन मुतालीक व लिहीणार ठेवतील त्याचे हातून कामकाज घेतजाणे व लक्ष्मण गोविंद यांस सनदा पत्रे करून दिली असतील ती माघारी घेऊन रामराव जिवाजी याजवळ देणे आणि मुतालकी संबंधे कलमदान दिले असल्यास माघारे घेऊन सरकारांत ठेवणें जाणिजे छ ९ रमजान आज्ञाप्रमाण मोर्तब.
पाो छ १३ रबीलावल बार.
सन सीतती सैन

---

**नंबर २८ नवाब रुकनु दौला यांची मोहोर.**

नबाब रुकनुदौला बहादर यांचे मोहरनेसी फारसी परवाना त्याचा तरजुमा हिंदवी-देशमुख व देशपांडे व मोकादम व रयत व कुणबी परगणे चाळीसगांव सरकार दौलताबाद सुबे पुजस्ते बुनियाद यांस लिहिले जाते कीं, मुबलग दोन हजार रुपये कामील परगणे मा॥र पै॥ परवान्याचे पाठीमागें तपसील लिहील्या प्रमाणें पंतप्रधान याजकडील **चिटनिस** याचे ज्यागिरीत तनखाइ जाले आसे. तर तुम्हीं मा॥र निले याचे नायबासी रुजू होऊन हरवक्त व हंगामसीर माल वाजबी आदा करीत जाता मागाहून परवाना तनखाही बा मोहर जाब त्या मवाफिक सादर होईल. त्या प्रमाणें आमलात आणावे छ २० जिल्हेज सन ११८२ हिजरी लिहीले गेले.

(परवान्याचे पाठीमागील तपसील.)

बमोजी बसत्राल दसखती रावपंतप्रधान याजकडील वकील विनंती करित आहे कीं साडे दाहा हजार रुपये जमा कामील परगणे चाळीसगांव सरकार दौलताबाद सुबे खुनस्ते बुनियास या पै॥ रावपंडित प्रधान याजकडील फडणीस व मजूमदार व चिटणीस व मुनषी यांचे ज्यागिरीत तनखाह व्हावे व हुजूरून सवालावर मोहर व मुबालग मा॥र ज्यागिरीची सनद बयानी जाबा त्या मवाफिक हासील होई तोपर्यंत दिवाणी मोहरनसी सनद तपसील जैला प्रमाणे करहमत केली पाहिजे. याचा तपसील

---

*ह्या दोन याद्या रा. रा. बळवंत रघुनाथ चिटणीस इनामदार जैतापूर याजकडून मिळाल्या.

ऐनजमा साडे दाहा हाजार (१०५००)

**तपसील**

८५०० याच्या सनदा अलाहिदा

| | | |
|---|---|---|
| ४००० | फडणीस | रु॥ |
| ३००० | मजुमदार | रु॥ |
| १५०० | मुनशी नारायणराव कृष्ण. | |
| ८५०० | | |

२००० चिटणीस.

———

१०५००

छ २० जिल्हेज सन हिजरी १८२१.

चाळीस गांव कसबा व साहीर खेडे वगैरे
जे गांव ज्यागिरदार; याजकडे बाहाल आहेत
ते खेरीज करून कामीऌ जमा २०००.

आमारत व आयालत मर्तबात खान आजी जुलमदार मवालात निशाफिद
विज्यानि पार रुकनु दौलामीर पुसाखांबाहादर एह तीषा मजंग दिवान यांचे
दसखताचा बयानकी सनद द्यावी.

ब ११
८७

**नंबर २९** श्री **नक्कल**

(तरजुमा फरमान आबदूल मुजफर जलालोदीन बादशहा याचे मोहोर निसी.)

हक सुबाहनीहुत आला.
मोहमदे रसुलीक मोहर हुजूर.

दरीवस्त खुषीचा भरलेला फरमान वाषन जरुरीचे ताबेदार याजवर सादर जाला की सरदेशमुखीची चाकरी परगणे जवळ मे बाहात सुभे खुजस्ते बुनियाद औरंगाबाद मे बागत व जिरायेत व जमलासार हक व रसुला हे त्रिंबकराव व॥ आनंदराव व रघुनाथराव व॥ चिमणाजी व गंगाधर व॥ रुद्र यास पुत्रपौत्रादि सिवाय कैप असामी हिशे माफतस दिला याददास्त अर्धे सरीफ क्वैईल पासुन याजिमन प्रो मुकरर आहे कीं, नौकरीचे चाली प्रमाणें करार बाकी समजून रयत लोक यासी पसंत सलुख करावा आणि तखुब दिलासा जमा अतीस निगाहाबानीनै जेर दस्त लोक व मालगुजारा नवजारे दसखती. चोरटेलोक यांस व शेताची जी यापती व मुलकाची आबादानी आणि देशचाल दौलत बढाई व मालगुज्यारी कोसीस तमाम जाहीर पोहोचावा आणि नवी गोष्ट न करावी व रयेत व शेत करणारे व दुसरे राहाणारे त्या जागेचे यास जे कसलुखाने राजी व खुष राखून हाक रुसुम मामुला प्रो घेत असावे व घेऱ्यात जुलूम न करावा पाहिजे, कीं हा कामवकिराम व आमल किफेयत फिरज्याम व मुतसदी लोक सरकार हालीचे व पुढें येणार व पाटील लोक व रयेत लोक व सेत करणोर याणी म॥र निल्हे यास हामेशा व हामेशा देशमुख कसबे म॥र मजबूत जाणोन नौकरीवल व हके या नौकरीमौलाईल म॥र यास मुकरर व मुकरर समजावे, व दुसरे हि^शा^बदार यास सरीकन समजावे. या बाबे ताकीद आकिहकद गनखुष जाणोन दरसाल नवीन सनदेची आपेक्षा करू नये आणि या हुकमाचे बाहेर न जाणे त॥ १३ माहे जिलकाद सन १४ आज जलुस ह्मणजे बादशाह तकतावर बसलेला सन या रोजी फरमान लिहीणे जाला.

पाहण्यांत आली

| | | |
|---|---|---|
| मोहर | रिसाला | दत्फरदार सैदहि |
| | आबदूल मनसूर | दायेत आलिखान |
| त॥ २९ मोहरम सन १४ | खान बहादूर | याची मोहोर २९ |
| | | मोहरम सन १४ |

17 JAN 1994
6 APR 1990

नंबर ३०

श्री.

*तीर्थस्वरूप **राजश्री आपा** वडिलाचे शेवेसी–

आपत्यें वेंकटराव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐशीजे. आम्हीं आपल्या पासून विभक्त जाहालो. त्यास सहा वर्षे जाली. तेव्हां मिळकतीचा व कर्जाचा वाटा घेतला नाहीं. आपण घ्यावा ह्मणोन बोलत होते; परंतु आम्हीं घेतला नाहीं. दोन्ही आर्थ आपले कडे राहिले. त्याजवरील आलिकडे आमचे कोण्हीकडे देणे घेणे होते. त्यास आपण आडथळ्यास आले. त्याजवरून × × × तेव्हां आपली नाहीं. त्या पेक्षां ऐवज आमचा असे ह्मणून कर्जदारास आपण पैसा न घ्यावा. या प्रकोंर सांगितले. त्यास आम्हीं दोनच्यारसे रुपयाचे कर्जदार आपले पासून निघालीयावर कर्ज वारावयास दुसरा आश्रय नाहीं. याजकरितां कर्जदारापासून कर्ज उगवावयाची मोकळीक करावी. एकसे नवद रुपयाचे खत मजपासी चिरंजीव बाबाजीचे मजपासी आहे. ते देतो, आणि सौ. कुसाबाईचे देणे शंभर रुपये आहेत. बारावे इनामात सर्वास विभाग दिल्हा. त्या प्रो मलाही विभाग द्यावा. ह्मणोन चिरंजीव **महिपतराव** आपल्यासी बोलिलात आपण मान्य केले. ऐशियास या उपरी आपणाकडे वाट्याचा वगैरे लढा आमचा राहिला नाहीं. मौजे भादे प॥ सिरवळ व मौजे काळदरी ता॥ निरथडी येथील इनाम समाईक ठेऊन पांच विभाग आपण मजला देत जा, व किल्ले पुरंदर येथील कारखानीसी व मौजे केन कवळे त॥ खेडेवारे येथील मुकासा इनाम आहे. ते चिरंजीव **दादा** कडील त्याजकडे ठेवावा. ऐसे सर्वांचे मते ठरले. त्यासी आपणांस संमध नाहीं. हे फारखत सही बहुतकाय लिहीणें हे विज्ञापना.

सदरहू प्रमाणें ती॥ कैलासवासी **गोविंदराव काका** व ती॥ राजश्री तात्याची फारखती आहे.

---

* ही नक्कल महिपतराव यांचे हातची आहे

श्री ... सौ. गंगुताई ... वाचनालय

नंबर ३१

या॥द ऐवज लाऊन द्यावयाचा—

३०० पे॥ चिटकोप येथील सावोऱ्याचा ऐवज गोविंदराव चिटणीस याजकडे कमावीस होती. ते वेळेस पावत होता त्या प्रो.

३५०० पे॥ जळगांव येथील सरदेशमुखीचा आकार दाहा रु॥ प्रो करावा तो चुकोन साडेबारा प्रो करून दिल्हा. आडीच रुपये ज्याजती जाले. सबब मोबदला. दुसरा ऐवज नेमून द्यावा.

६५०० खंड विसाद येथील मोबदला.

३०० मनमुचीस गोदे येथील फत्तेसिंगाकडील बावगी गावाचे पावते जाले. सबब मोबदला.

५००० प॥ चिटकोद येथील चौथाई सरंजामात ४०००० च्यालीस हजारास लाऊन दिल्ही होती. हाली कराराचे यादीत पंचतालीस धरले आहेत. ते रदबदलीमुळे च्याळीसाचे च्याळीस करार केले सबब मोबदला.

————

१५६०००

नंबर ३२.

**महिपतराव** यासी कलमे सारांशात **बळवंतराव मल्हार** याणी पंचाचे पुरसीवरून लिहून दिल्ही. त्याचा उतारा सारांषातोन घेतला तो येणेप्रमाणें:-

१ पुरसीस **बळवंतराव मल्हारराव चिटणीस** सु॥ आब आशरीन मया तैन व आलफ **गोविंदराव चिटणीस** याणी

वाटणीची यादी केली आहे. त्या यादीत सरदेशमुखी प्रां चेऊल येथील हाकाचे उत्पन्न होईल त्या पौ **महिपतराव मोरोबा** याचा विभाग जाऊन बाकी राहिले ते चौघानें घ्यावें. असे कलम लिहिले आहे. त्यास उभयताचे हिशास काय दिल्हे ते वडील किंवा धाकटे याचे उत्तर लेहून देणे छ १'९ जिल्हेज.

याचे उत्तर **महिपतराव मोरोबा** याचे कोणी बोलणार नाहींत. त्याचे बोलणें पडेल, तेव्हां त्यासी उतर करणें ते करूं. तत्रापि आपण पुरसीस घातली त्याचे उत्तर **महिपतराव** व **मोरोबा** यांस देणें ते देऊन समजूत करितो. महिपतराव व मोरोबा धाकटे भाऊ आहेत.

१ गोविंदराव बावा याणी प्रांत चेऊल येथील सरदेशमुखीचे हाकाचे उत्पन्न महिपतराव व मोरोबा याचा विभाग जाऊन बाकी राहिले ते, चौघांनीं घ्यावे असे कलम स्पष्ट लिहिले. कुरकूंडी, कोलटबी त्यांत लिहीली नाहीं. तेव्हां शास्त्रार्थ होणे राहिला आहे कीं काय पहावे. तेव्हांपासुन इनामगांवची वहिवाट आम्हींच करितो. छ मजकूर हस्ताक्षर **व्यंकटेश बापुराव** दि॥ चिटणीस

१ पुरसीस **बळवंतराव मल्हार चिटणीस** सु॥ आर्बा आशरीन मयातैन व आलफ कुरकुंडी. कोलटबी प्रांत चेऊल हे गांव सरदेशमुखीच्या पेटयातील आहेत. त्यास **महिपतराव** व **मोरोबा** यास विभाग दिल्हा ह्मणोन उतरात मोघम लिहून दिल्हे त्यास दोन गांव सध्या आकार धरून हिस्सा दिल्हा. त्याचे उत्तर लेहून देणे छ १७ जिल्हेज.

---

नंबर ३३. श्री

## यादी सरकारांत ऐवज घेतला येणेप्रमाणेः-

चिटणीस मजमदार चाळीस चाळीस हजार रुपये घेतले. **गोविंदरावबावा** **विठलराव पोतनीस** पंधरा हजार घेतले. आह्मांस वळून वेतनाया ऐवज

**चिटणविस** याजकडे करार पनास हजार यासिवाय ब्राह्मण मंडळी वगैर सर्वापासून घेतले तुमचे प्रांतातील दरबार वरगी घातली आहे नाहीं हे समजले नाहीं. कळलीयावर लेहून पाठवू.

गु॥ सन आर्बा पौ बाकी चवदासे व साल मजकूरच्या दरोबस्त गांव सुध्धां ऐवज कापड देखील व इनाम जमिनीचा ऐवज दोनसे रु॥ येकूण साडेतीन हजार पडले त्यांत साडे येकोणीससे रुपये वस्ता गाहाण ठेऊन दिल्हे. त्यासी उपाय नाहीं.

रा॥ छ २९ रमकर बहुत काय लिहीणें हे आसिर्वाद.

---

**नंबर ३४.** श्री.

## यादी भाऊपणाची वांटणी सारांशा बार.

१ सन समान सीतैनात वाटणीची याद **गोविंदराव बावा** याणी केली. त्या यादीत प्रांत चेऊल येथील सरदेशमुखीचे हाकाचे उत्पन्न होईल. त्या पै॥ **मोरोबा महिपतराव** याचा विभाग जाऊन बाकी चौघाने घ्यावे हें मुळींच लिहीले नाहीं.

१ सनसमान सीतैनात वाटणीची याद जाली. त्यास त्यासालचे ऐवज एकंदर जमा धरून वाटणीबरहुकूम ऐवज ज्याचे त्याचे त्याचे नांव लिहून धडा घातला. ते यादी बाबुराव दिवाणजीचे हातचे आहेत. त्यांत इनामगांव वतनी ऐवज सरदेशमुखीचा जमा धरून रु॥ २१६२॥। पैकीं इनामगांवचे रु॥ ५१६ अलाहिदा मखलासी ह्मणोन वजा करून बाकी १६४६॥.

**याची चौभाग विभागले ते.**

४११॥= ४११॥= ४११॥= ४११॥=

त्या प्रो वाटखी करून ज्याचे त्याचे नांवे वांटणी.

१ आलाहिदा मखलासी ह्मटली त्यास **गोविंदराव बावा** याणी एकंदर जमाधरून भाऊपण्याची वाटणी करावयासी सांगितले. ह्मणोन**गोविंदराव बावानीं** सांगितले. असे **आवजी बापुजीनें** यादीवर लिहन यादी केली. ते **आवजी बावाचे** हातची

आहे. त्याची नकल आजमासे वतनी ऐवज सन समान सीतैन मयातैन व आलफ.

२१६२॥। सरदेशमुखी प्रांत चेऊल वरहुकूम हिशब साल

गु॥

१९२॥।' नक्त रुपये-

१५० दुतर्फा पै॥

६॥।' चाकर मानें.

३६ इनामगांव.

———

१९२॥।'

१९७० गला भात खंडी.

१२५ भाईन एक तर्फा.

९२॥।' दुतर्फा पै॥.

१।' बांधण.

४८ इनाम गांव पै॥

पै॥ वजापरभार

४० महिपतराव

१० आबाजी नारोळकर.

२० मोरोबा व राघोबा.

—

७०

बाकी १९७० दर खंडी रु. १६.

———

२१६२॥।

नंबर ३५ श्री नकल.

राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान यासीं आज्ञा केली ऐसीजे:—

**रामराव जिवाजी व बापूजी खंडेराव व गोविंद खंडेराव चिटणीवीस** यांचे वडिलांनीं राज्याभिवृध्धीस्तव श्रम साहस बहुत केले. हालीही करीत आहेत. याजवरून पूर्वीच्या चिटणिविसास सरंजाम आहे. तो इनाम करून दिल्हाच आहे. हाली नवासरंमजाम चहूं लक्षांचा लावून देण्याविषयीं तुह्मांस आज्ञा केली आहे. तरी येणें प्रो वसुली महाल व गांव किल्ले सुद्धां रु॥

२००००० रामराव जिवाजी.
१००००० बापूजी खंडेराव.
१००००० गोविंद खंडेराव.
——————
४०००००

सदरहू प्रों चहू लक्षांचा सरंजाम लावून देण्याविषयीं स्वामीचें वचन जालें आहे. तरी निवडून लावून देणें जाणिजे. छ ५ माहे रविलावल सुरसब अर्बेन मयाव आलफ.

---

न. ३६ श्री

यादी महिपतराव त्रिंबक यांची घर पागेची घोडी स्वार २५ पंचवीस यास सरंजाम फत्तेसींग भोसले याचे सरकारांत कामकाज होते ते करून भोसले याजपासून अंतस्थ मेळविले रुपये ३१००० एकत्रीस हजारास ऐवज फत्तेसिंग याचा अंमल प्रांत जुनर वगैरे प्रांती होता. त्या पैकीं नेमून घेऊन सदरहू ऐवजाचा अमल गावगनाचा कैलासवासी नानासाहेब यांस समजाविला. तेव्हां नानासाहेबी सदरहू ऐवज पै॥ रु॥ १४००० चौदा हजारचा गावगनाचा अमल फत्तेसींगा बाबत सरकारांत ठेवून बाकी ऐवज स्वाराचे सरंजामास करार करून दिल्हा गावगना पै॥ ७००० रु॥

स्वारास रोजमरा द्यावा त्या ऐवजी नेमून दिल्हे रु॥. ५००
——————
७५००

साडेसात हजार याचा मजकूर मा। निले याणी सदरहू प्रो सांगितला सबब तपशील वार लिहिला असे यासी सरंजाम गावगना पै॥

रु॥ ५४९८।≶ प्रां करहाड पौ गांवगना

२८७८ प्र॥ वाई पौ गांवगनाची मोकास बाब फत्तेसींग भोसले याज ब॥ पेशजी निमे सरकारांत घेतली होती व निमे फत्तेसींग याजकडे होती ते नानास राऊताचे ऐवजी फत्तेसींग याणी दिल्ही येकूण दरोबस्त मुकासा गावगना रु॥ प्रो निमे.

| | निमे ब॥ झाडा | निमे बा याद |
|---|---|---|
| मौजे जाब | ७८३॥. | ७८३॥. |
| मौजे न्हाव्ही | ४२५ | ४२५ |
| खूर्द मौजे | | |
| तांदूल वाडी | ५० | ५० |
| मौजे नादवावल | ६५ | ६५ |
| मौजे दही गांव | ८७॥ | ८७॥ |
| | १४११।. | १४११।. |
| नजरे बद्दल फत्ते सींग याजकडे निमे मोकासबाब होती. त्या पै॥ सरकारांत येत होते ते रु॥ | ५०० | |
| | १९११।. | १४११।. |
| | ३३२२॥. | |

पै॥ वजा नजरेबाग भोसले याचे निमे मोकास
बाबेचे ऐवजी सरकारांत जमा होत होतें ते
रु. ५०० पांचशे हली दरोबस्त मोकासा बाब
जमेस आली. सबब सदरहू बेरजेत वजा केले.
बाकी रु॥ २८२२॥.
किता मौजे न्हाव्ही खुर्द ५५॥.
संमत कोरेगांव पै॥
३० सरदेश मुखी
२५॥. भाडे पटी

———— ————

५५॥. २८७८

————— ——

८३७६।≶

तपसील.

७१७०॥।≶ मा॥रनिले कडे राऊतास सरंजाम होता ते गावची बेरीज रु॥

१२०५॥. परभारे गांव मा॥रनिलेनी सांगितले. त्याजवरून जाब त्यास वजा घातले ते बेरीज रु॥

९०५॥. मौजे न्हाव्ही खुर्द आ॥ कोरेगांव प्रां॥ वाई हा गांव **महिपतराव चिटणीस** याजकडे आहे सबब कीं पेशजी राऊतास सरंजाम फत्तेसींग भोसले याणी दिल्हे. ते समयीं मध्यस्तीचे बोलींत चिटणीस मा॥रनिले होते सबब मौजे मा॥र चिटणीसाकडे रु॥

३०० अहिल्याबाई सिंदी दि॥ हुजरात यास त्रिंबकराव विश्वनाथ सातारीयास होते ते समयीं मौजे चिखली ता॥ उमरज प्रां॥ कराड येथील मोकासा बाबेचा अंमल देविला सबब.

महिपतराव चिटणीस याचे जाबात्यास मौजे मा॥रची सदरहू बेरीज धरली आहे

————

१२०५॥.

————

८३७६।≶


आठहाजार तीनशे शहात्तर रुपये सात आणे गावची बेरीज सदरहू प्रमाणें व याज दप्तरी जाबा त्यास लागला असे.

---

नं. ३७ श्री

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री शंकराजी केशव गोसावी यांस

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष नाखवाईस फजीरखा गीद॥ राजश्री **गोविंद राव चिटनिवीस** यांचे ज्याहाज राजापूरच्या बंदरी आहे. ते वसईच्या बंदरी येऊन खरीदी फरोख्ता करिता येतील तर वाजबी जकातीचा हासील घेऊन अमद रत्फी करू देणें हरयेक विशी जाजती उपद्रव लागो न देणे जाणिजे छ १६ जिल्हेज सुमत्तीसा ओबेन मयाव आलफ




नं. २७ श्री नकल

यादी त्रिंबक महिपतराव चिटणीस सु॥ खमस सबैन मयाव अलफ चिटणीसी समधे एक साला सरकारांत कर्जपटी ब॥ देखील गांव चालत आहेत. त्या सुधां बेरीज रु॥ ४०००१ एकूण चाळीस हजार एक रु॥ करार केले असत एका महिनियान भरणा करावा सावकाराची वरात होईल त्याचे येणें प्र॥ करार करावे.

छ ११ र॥ न वैशाख मास. सबासबैनचे साली २००००

इदिदेसुमानीन ३०००

श्री. सौ. गंगु... पंत...
वाचनालय
भोर.

नं० ३८ श्री

श्री शिव शंभु
स्वामिनी शाहू भूपच
पार्थिवात सांप्रमिणतचे
निष्टतः फत्तेसिंहस्य
मुद्रंम.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्ये राजश्री फत्तेसींग भोसले त॥ मोकदमानी मौजे गांव त॥ आष्टी सु॥ आर्बाईन मया अलफ मौजे पिंडी॥ इसनी प॥ राजश्री **बहिरव खंडेराव चिटणीस** यांजकडे मुकासा आहे. तेणे प्र॥ करार असे तरी म॥रनिलेप रुजू राहून मुकास बाबेची आमल सुरळीत देणें जाणिजे छ १७ जमादिलाखर प॥ हुजूर

लेखना
वधिसुद्रा.

न. ३९ श्री

श्री
बाळाजी प्रभु पुत्रस्य
खंडराजस्यधीमतः॥ मुद्रा
सर्व गुणोपेता राजसन्मान
वर्धिनी

श्री. सौ. गं. पं. वा...
दाखल नं
भोर

आज्ञापत्र राजश्री **बहिरव खंडेराव चिटणीस** त॥ मोकदमानी मौजे धनेगांव त॥ अष्टी सुरसनइहिदे खमसेन मयाव अलफ मौजे मजकूरचा सन

अर्बैनचा वसूल राजश्री गोविंद निळकंठ कमाविसदार याजकडे दिल्हा नाहीं ह्मणून हुजूर विदित जाहाले ऐसी यासी वसुल ठेवावयासी प्रयोजन काय ऐसे नादान हाली देखत पत्र सन आर्बैनचा वसुल मशारनिलेचे पदरी घालणें याकामास——यांसमसाला रु॥ ५ पांच आदा करणें जाणिजे छ १६ माहे रमजान

लेखन

सिमा.

न. ४०

श्री

श्री
राजाराम नरपति हर्ष
निधान बाळाजी
बाजीराव प्रधान.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान मोकादमानी मौजे धनेगांव ता॥ आष्टी सु॥हिदे खमसैन मयाअलफ मौजे मजकूर पेशजी पासून राजश्री **बहिरव खंडेराव चिटनिवीस** याजकडे मुकासा आहे ऐसीयास सन आर्बैनचा वसूल तुम्हीं रा॥ गोविंद निळकंठ कमाविसदार याजकडे दिल्हा नाहीं, ह्मणून हुजूर विदित जाहाले तरी सन आर्बैनचा वसूल तुटक असेल तो सुदामत प्रमाणें मा॥रनिलेकडे सुरळीत पणे देणे, फिरोन बोभाट हुजूर येऊ(न) देणे जाणिजे छ १९ रमजान पा॥ हुजूर

लेखन

सिमा.

न. ४१ श्री

श्री शिव शंभु
स्वामिनि शाहु भूपेच
पार्थिवो तमें ॥ परिणतचे
तोव्रेत: फत्तेसिंहस्य
मुद्रेय.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री फत्तेसिंग भोंसले ता॥ मोकदमानी मौजे धणेगांव त॥ आष्टी सु॥ सबा सल्ला सीनमया अलफ मौजे मजकूर पेसजी राजश्री **बहिरव खंडेराव चिटनवीस** दि॥ श्वारी याजकडे मुकासा आहे तेणे प्रा॥ करार असे तरी म॥रनिले कडील कमाविसदारास हुजुराहोन मुकासबाहेचा आमल सुरलीत देणे जाणिजे छ २५ जमादिलावल प॥ हुजूर

लेखन
निधि सुद्र.

न. ४२ श्री

श्री शिव शंभु
स्वामिनि शाहू भूपेच
पार्थिवो तमें ॥ परिणतचे
तोव्रेने फत्तेसिंहस्य
मुद्रेय.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री फत्तेसिंग भोसले त॥ मोकादमानी मौजे धणे गांव त॥ आष्टी सु॥ इहीदे खमसेन मया आलफ मौजे मजकूर पेशजी पासून राजश्री **बहिरव खंडेराव चिटनीविस** याजकडे मुकासा दिल्हा आहे. तेणें प्रमाणे करार असे. ऐसियास म॥रनिलेनी सन आर्बाची गोविंद निळकंट यांस कमाविस सांगितली होती. त्यास मुकास बाबेच एक रुपया दिल्हा नाहीं. ह्मणोन हुजूर विदित जाहाले. त्यावरून हे आज्ञापत्र

सादर केले तरी सन आर्बाचा वसूल अद्याप न द्यावयास प्रयोजन काये. ऐसे गोष्टीनें मुलाहिजा होणार नाहीं. याउपरी आज्ञापत्र देखत आर्बाचा वसूल याजसी मा॥रनिलेकडे देणें जाणिजे छ २५ रमजान प॥ हुजूर

बार सुरुसुद बार

लेखन निधिसुद.

नं. ४३ श्री

शेवेसी सदाशिव रघुनाथ कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना त॥ छ १३ रा।कर मुक्काम तासगांव येथें सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष सांवत वाडीकर यांजकडिल कामें करारप्रमाणें करविरकराकडून निर्गमांत नयेत. असें स्वामीस समजोन राजश्री परशरामपंत भाऊ यांसी मोहिम कर + + ची सांगितली त्यावरून याची तयारी होत आहे, तो दरम्यान करवीर करानीं रा॥ आपाजी भगवंत यांस राजश्री पाटील बाबाकडे पाठऊन, त्याजकडील आबा चिटणीस व बाजीबा मोदी व नारायणराव जिवाजी व नारायणराव घोरपडे व आत्माराम नाईक वांकडे यांचें विद्यमानें साठ हजार रुपये अंतस्थ करार करून सांवताकडून तोफा ( ) वसूल व भाऊकडील तोफखानें संबंधी वगैरे मसलतीचा खर्च एकूण तीन कलमाचा उपसर्ग न लागता सावताचा प्रांत सांवताचे हवाली करून त्याची पावती आणून दिल्यावर पंधरा हजार रुपयाचा सरंजाम आबा चिटणीस यांस द्यावयाचा करार करून राज ( ) ची कामे भाऊकडील करून ध्यावयाविसीं पाटील बावाची भीड सरकारांत घालून त्याजकरवी कामें करून घ्यावी, आणि भाऊ मोहीम करतात. त्यास त्याणीं मोहिम करू नये, असी नानाची चिटी घेऊन पाठवावी. याप्रमाणें परस्परें तेथें बोलणें होऊन त्याजकडील खिजमतगार देवजी रोकडा व पत्रें करवीरकरांस प्रांत देणें विसी व सांवतास प्रांत घेऊन पावती देणेंविसीं, पाटीलबाबाकडील सदरहू मुछ-दियांची पत्रें आणून मशारनिल्हेनी करविराकडून सोडविल्या व हुजूरे घेऊन सांवताकडे गेले त्यास वर्तमान सांगोन पत्रें दिल्ही आणि प्रांत व ठाणीं

 17 JAN 1994

हावाली करून घ्यावी आणि पावती द्यावी. असें ह्मणत असतां त्याणीं सरकार व पाटीलबावा व भाऊ यांचे आज्ञेविरहित किल्ले ठाणीं व प्रांत कसा घ्यावा, असा विचार करोन उत्तर यांस सांगितले, परंतु याचा आग्रह ठाणी हवाली करणें विसीं पडला. तेव्हां देवजी नारायण, बाजीबा मोदी यांचे बंधु, याणी आपले हवाली किले भरतगड व निवती वगैरे घाटा खालील मुलुक करून घेतला. ह्मणोन वर्तमान कळलें. सत्य मिथ्या नकळे. आबा चिटणीस व बाबाजी मोदी व नारायणराव जिवाजी बक्षी याची पत्रें आपाजी भगवंत सांवत यांस आली होती. त्याच्या नकला स्वामीस आवलोकन व्हाव्या. करितां सेवेसी पा। आहेत. सांप्रत माहाराज व बाजीराव चिटणीस व आबाजीराम बळवंतराव यांचे बंधु व दिनकरपंत बच्याजीपंतांचे बंधू याणी शेवकास रोजमरे व पोटगी मिळोन सातआठसें रुपयाचे पेंचात आणून सांगितले कीं श्रीमंतांची सांवताकडील प्रांताच्या सोडचिठ्या भाऊकडे पाठवून इकडील मसलत त्यांस सांगितली. त्या पक्षी श्रीमंताकडील आज तुटले? तेव्हां तुमचे रहावयाचे प्रयोजन नाहीं. राहाणार तर राहा. जाणार तर जा. खर्चास मिळत नाही. तुमचा पैका जो देणें आहे. तों एकंदरांतच काय होणें तें होईल याप्रमाणें सांगितलें. तो मजकूर भाऊस लिहिला. त्याचे उत्तर आलें कीं ते मुरळीतपणें एकावयाचे नव्हत. त्याचीही खातरजमा लौकरच होईल. तुम्हीं निघोन येणें ह्मणोन लिहीले. ते पत्र राजश्री सुध्दां सर्वोस दाखऊन स्वामीच्या पुण्यें करून सर्वांचे निरोप घेऊन तासगांवास आलो. भाऊ याजपासी आहे. करविर करांकडून रोजमरे व पोटगीचा ऐवज येणे त्यांस त्याजकडील बच्याजीपंत बळवंतराव यांस ताकीद होऊन करारप्रमाणें फडशाकरून द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे. करवीरी असतां वाण्याची उचापत पावणे तीनसें तीनसें पर्यंत झाली त्याचा तगादा त्यें समयीं लागला. तेव्हां एका ग्रहस्थास दरम्यान देऊन वाइदा मुदत करून येथें निघोन आलों तेथून निघतांना वाण्यानें आडऊन पदरी धरावें सरकारचा, सेवकाचा, बदनक्ष व्हावा, आपण तमासा पाहावा. या प्रों करवीरकर याणीं केलें होतें. परंतु स्वामीच्या पुण्येंकरून कसी तोड काढून निघोन आलों. परंतु ज्यास दरम्यान दिल्हे. त्याचा वेशव्याचा ऐवज त्याजकडून येणें तों ऊगऊन देविणार स्वामी समर्थ आहेत. करवीरकर याचे कृतिचा आर्थ आपाजी भगवंत याच्या बोलण्याचा आशय समजोन सेवेसी लिहीला आहे. सत्य मिथ्य नकळे. सदरहु मजकूर पाटील बावाकडील रा। रामजी पाटील यांसी

स्वामबलेंतील तरीं त्यांस हा मजकूर समजला आहे परंतु त्यांचे वस्तु बक्षी व मोदी व चिटणीस यांसी बसून बोलोन त्याची नालस्ती बावासी बोलवत नाहीं आर्थी स्वामीनीच बावांसी समक्ष बोलोन बंदोबस्त व्हावा शेवेसी श्रुत होय + + +

---

नं० ४३ श्री नकल

राज्यश्री गोविंदराव चिटणवीस गोसावी यांसी

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ दमाजीराव गाईकवाड सेनाखासखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल त॥ छ ११ रमजान पावतों मुकाम नवसरी येथें जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असले पाहिजे विशेष—आपणाकडून पत्र येऊन श्रुत जाले. रावसाहेब आपण आमचे विसी **श्रीमंतछत्रपती** जवळ बहुत श्रम करून **महाराज** वर्तमान असतां आमची रवनगी गुजराथ प्रांतीं आपण केली ह्मणून आलों. मागें **माहाराज** कैलासवासी जाले. चिरंजीव राजेश्री फत्तेसींगराव व मानाजीराव व गोविंदराव यांस आपले घरीं ठेऊन बरदास्त करून सर्व प्रकारें सांभाळ केला, आणि सरकारचे देण्याचा हवाला घेतला. प्रतिबंधापासून मुक्त करविले. ते रुपये आपल्यास पाठविण्याविसी चिरंजिवाकडून लिहून आले त्यासी तजवीज करून पाठविण्यांत येतीलच. रावसाहेब चिरंजिवास मोकळे केले. हा उपकार विसरणार नाहीं. आपली चिटणीसीची आसामी सरदारी बराबर वस्त्रे आपले चिरंजीवाचे नावें करून घेतली. त्याची तैनात सालीना रु॥ २५००० घरबेठे माल दरमाल पावते होतील, आणि आपलेकडे कारकून दरखाचे कामावर येईल, त्यास साल दरसाल रु॥ ५००० व पनास घोडी पागेची त्यास वेतन साल दरसाल रु॥ २१००० येकूण सालिना रु॥ ५१००० देत जाऊं. या शिवाय * * फरमासजी होईल, त्यास अंतर होणार नाहीं. यासी श्री कुळस्वामीची शफत असे. आपण मुलाचा सांभाळ करिता. आमचे सरदारीची चिंता आपल्यास आपली जाणून तेथील बंदोबस्त ठेऊन वरचेवरी पत्रीं सांभाळीत जावें. विस्तार काय लिहूं बहुत काय लिहीणें. लोभ कीजे हे विनंती.

मोर्तब.

नं० ४४ श्री नक्कल

राजमान्य राजश्री **जिवाजी खंडेराव चिटणीस** यासी आज्ञा केली ऐसिजे. तुम्ही विनंती केली कीं पूर्वी कैलासवासी **महाराज** याजपासी आपले वडिलानी सेवा एक निष्ठेनीं केली. त्याजवरून कृपाळू होऊन स्वामिनी संपूर्ण राज्यांतील सरकारकून व सरदार व किल्ले कोट व ठाणी व जंजिरे येथील चिटणीशा व कारखानिशा व जमानिशा हे तिन्ही धंदे वंशपरंपरेनें करार करून देऊन शफत पूर्वक वचन दिल्हे. त्याप्रमाणें चालत आहेत व महाराजासही आवगत आहे. त्याज प्रों येविसी स्वामीचे अभय पत्र असावे, त्याजवरून पूर्वी पासून तुमचे वडिलांनीं सेवा बहुत केली व कैलासवासी **महाराजांनीं** शफत पूर्वक मदरहू तिन्ही धंदे वंशपरंपरेनें दिल्हे ते करार असेत. तरी सेवा तिन्ही धंद्याची करीत जाणे जाणिजे छ १ जिल्हेज सुरसन अर्बासलासीव ३० मीन. महाराजांचे स्वदस्तूर **कैलासवासी** महाराज तुमच्या वडिलांची **स्वामीच्या** व राजाच्या कल्याणासाठीं केली बहुत सेवा याजवरून संतोष होऊन **स्वामीच्या** राज्यांतील सरदारी कारकूनी. किल्ले, कोट जंजिरे. ठाणी याची चिटणीशी व कारखानिशी व जमिनीशी वंशपरंपरेनें करार करून देऊन स्वामीच्या वंशाचा असेल तो चालवील. अशी आण शफथ केली आहे. त्या प्रों तिन्ही धंदे करार आहेत. सेवा करणें बहुत काय लिहीणें.

नं० ४५ नक्कल

श्रीआंबाबाई प्रतिनिधीकडील पत्र

यादी निसबत राजश्री **रामराव जिवाजी चिटणीस** सु॥ तिसातीसैन मया आलफ संपूर्ण राज्यांतील चिटणीसी श्रीमंत थोरले माहाराज छत्रपती स्वामी यांणीं वंशपरंपरेनें सरदार सरकारकून आष्टप्रधान सु॥ शफत पुरःसर पत्रें करार करून देऊन चालविले. त्या प्रों हुजूर व सर्वाठाई चालत आहे. आपणाकडे पूर्वी कारकून लिहीण्यास होते. व आलिकडे कैलासवासी पंतयांनीं ही कारकूनांचे नावें पत्र दिल्हे आहे. त्यास हाली एक खाशास जवळ ठेऊन दरख चालविला पाहिजे.

खाशाचा बंदोबस्त

कारकून लिहिण्याचे कामास लागतील त्याचा.

कैलासवासी **माहाराज शाहूराजे** यांनीं हातरोखा स्वदस्तुरचा कुल राज्यातील चिटणीसी वगैरे वतनी तीन रोजगार तुम्हांकडे लाऊन दिल्हे. तोच बदजीन्नस आणून दाखविला. त्या अन्वयें इकडील चिटणिसीचें कामकाज तुम्हांकडे चालावे, परंतु पेशजी शेणवी याजकडे वहीवाट होती. हाली या पत्रा प्रमाणें तुमचे हातून सेवा घेण्याची येणें प्रमाणें करार.

पूर्वीं पागा चाकरीस होती. त्यास गांव ऐवज लाऊन बंदोबस्त करून दिला होता. त्याप्रमाणें करून दिला पाहिजे. तुमचें चालविणें अवशक पक्षी सोईनें होणें तें होईल येणें प्रमाणें करार.

छ २ रमजान सन तीसा तिसैन माघमास मु॥ पुणें.

---

**न. ४६** श्री नक्कल

करवीराकडील प्रकर्ण

श्री यासह चिरंजीव विजईभव राजश्री संभाजी राजे यांसी प्रती शाहूराजे कृतानेक आसिर्वाद उपरी आपला व आमचा तहनामा जाहला. त्यापासोन वारणे पलिकडील आपले राज्यांत राजश्री **जिवाजी खंडेराव चिटणीवीस** याजकडील धंदे व वेतन चालवावयांस आपण संशय धरितात. हे उचित नाहीं. याच्या वडिलांनीं या राज्यांत आपल्या अभिष्टास्तव जीवाभ्यास श्रम सहास पूर्वीं पासोन बहुत करून सेवा निष्टेनी कली. त्याजवरून कैलासवासी थोरले **महाराज** याणी याचे वडिलावर कृपाळू होऊन आपले व आपल्या राज्यातील सरदार व सरकार कून व किल्ले कोट व ठाणी व जंजिरे येथील चिटणीसी व कारखानिसी व जमिनिशी हे तिन्हीं धंदे यांस वंशपरंपरेनें चालवण्या विसी शफत पुरस्कर करार करून दिल्हे, ते तुम्हीं आम्हीं चालवावे. हे विदीत आहे. याजकरितां म॥ निल्हे याजकडिल सदरहू धंदियावर कारकून ठेविल आहेत. व ठेवतील. नवीन स्थळे संपादन होतील. याजवरी ठेवतील. त्याजपासोन सेवा घेवोन चालवीत जावे. व यासीं प्रांत पन्हाळा येथील नाडगौडिचे वतन दरोबस्त करून दिल्हे आहे त्यास वारणें पलिकडी कर्याती आहेत. तेथील नाडगौडीचें वतन म॥रनिल्हेकडे वंशपरंपरेनें सूरळीत चालविले पाहिजे. छ १५ जिलकाद मु॥ इसने सलासीन मया आलफ. वडिलानीं शफत कली आहे. याजवरून तीन धंदे चालवाल. आसिरवाद. (हास्त अक्षर महाराजाचे हातचे).

नं. ४७ श्री नकल

राजमान्य राजश्री **गोविंद खंडेराव चिटणिवीस यांस** श्रीमंत माहाराज मातोश्री जिजाबाई साहेब आज्ञा केली ऐसिजे--सु॥ इसने सितान मया आलफ तुम्हीं विनंती पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण झाला. तुम्हीं पुरातन सेवक. या राज्याचे कल्याण व्हावें यावीच्यारे तुम्हीं एकनिष्ठपणें सेवा करित आला आहा. पुढेंहि तुमचे हातून सेवा घ्यावी. हे साहेबास परम आवश्यक येविसींची साविस्तर आज्ञा राजश्री खंडेराव गोविंद पारसनीस यासी केली आहे. आज्ञे प्रमाणें लिहीतील त्यावरून कळो येईल. सेवाकरून कृपेस पात्रहोणें आपणाकडे आहे. येविसीची सविस्तर आज्ञा राजश्री कुसाजी जनार्धन यासी केली आहे. ते सांगतील. त्याजवरून कळेल. आपण दुस्त पाठविला तो प्रविष्ट झाला. जाणिजे छ ४ जिलकाद बहुत काय लिहीणें. मोर्तब
पा॥ छ ११ जिलकाद जेष्ट

बार.

ससइसने सीतन

---

नं. ४८ श्री नकल

श्री यासह चिरंजीव राजमान्य राजश्री संभाजी राजे यासी प्रति शाहूराजे आसिरवाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें वि॥ राजश्री **जिवाजी खंडेराव चिटणिवीस** याणीं विनंति केली कीं, पूर्वी आपले वडिलांनीं स्वामी सेवा बहुत निष्ठेनें केली. त्याजवरून. माहाराजानें कृपाळू होऊन संपूर्ण राज्यातील सरकारकून व सरदार व किलेकोट व जंजिरे येथील चिटणीशी व कारखानिशी व जमेनिशी हे तिन्ही धंदे वंशपरंपरेनें करार करून दिल्हे आहेत. याच प्रमाणें चालत आहेत. व स्वामीनी प्रांत पन्हाळा येथील नाडगौडिचें वतन करून दिल्हे. त्यांस सांप्रत दोन्ही राज्यांतील तह झाल्यामुळे वारणे पलीकडील पन्हाळा प्रांताची नाडगौडीस दिकत पडली आहे व एकदोन गांव राजपत्रीं चालत नाहींत व तिन्हीं धंदे पूर्वी पासून चालतात त्याजप्रमाणें सुरळीत चालावें येविसीं एकदोन पत्रें नेली असतां चालत नाहीं याजवरून हे पत्र लिहीले असे. तर तीन्ही धंदे व नाडगौडी पेशजी प्रमाणें चालते करावे. तुम्हांस एकदोन वेळा

चिटनिशींच्या धंद्या वि॥ लिहीलें असतां सुरळीत केले नाहीं. हे ऊचित नसे. याच्या वडिलांनीं कैलासवासी ती॥ महाराजापासी सेवा गोव्यास बहुत केली. तेव्हां बहुत संतोष होऊन शफत करून राज्यांतील तीन धंदे वंशपरंपरेनें दिले व चंदिवर संकट पडले, तेव्हां जिवा श्रम करून काढून आणिले. तेव्हां केली तर हे तुम्हीं जानत आहा. तर सुरळीत तीन धंदे याजकडे चालवावे. व वारणे पलिकडील ही नाडगौडी याची याकडे चालवावी. हे आसिर्वाद.

---

**न. ४९** श्री नकल.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यासी

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहींणें विो ठाणे तासगांव येथील चिटणीसी राजश्री **रामराव जिवाजी चिटणीवीस** दि॥ हुजूरात याजकडे पेशजी पासून चालत आहे. म॥रनिल्हेचे तर्फेनें चिटणीसीचे कामावर येसाजी खंडेराव आहेत. त्यास वेतन रुपये दीडशे व जमीन बिघे तीस आहे. त्याप्रमाणें करार असे तरी तुम्हीं याचे हाते ठाणे मजकूरचे चिटणीसीचे कामकाज घेऊन सदरहू रुपये वेतन व जमीन सुदामत चालत आल्याप्रमाणें सुरळीत चालवणें जांणिजे. छ २५ रमजान सुरुसन इहिदेसबैन मयाव आलफ बहुत काय लिहींणें हे विनंती.

---

**न. ५०** श्री नकल.

राजश्री रामचंद्र जिवाजी चिटणीवीस गोसावी यासी.

**छ** सकल गुणालंकर्ण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये प्रति उमाबाई दाभाडी विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहींणें. या नंतर कैलासवासी **जिवाजी खंडेराव** यास वर्षासन रुपये ३००० तीन हजार होते. सांप्रत तुम्हांस द्यावयाचे करार करून हे पत्र दिल्हे असे. सदरहू तीन हजार रुपये सालोसाल प्रविष्ट करू यांस अंतर करणार नाहीं. ऐवजाची नेमणूक राजश्री दमाजी गायकवाड याजकडे सुरत गुजराथचे ऐवजी देविला असे. बहुतकाय लिहींणें छ. १ साबान सु॥ खम्मास आरबैन मया आलफ.

---

नं. ५१ श्री नकल.

राजश्री **गोविंद राऊ चिटणीवीस** गोसावी यांसी

छ श्रीसकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रौ दमाजी गायकवाड समशेर बहादूर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत गेले पाहिजे. विशेष. आम्हीं तुम्हांस महांद खर्च दरसाल रुपये २५००० पंचविस हजार निर्दोश पाठवीत जाऊं.

बी॥

२०००० महादखर्च खासगत रुपये.
५००० तुम्हीं आपला भाऊबंद अथवा चिरंजिव आह्माजवळ ठेविला त्यास दरसाल.

———
२५०००

(स)दरहू प्रमाणें निर्दोश पाठवित जाऊन याजखेरीज तुम्हीं आह्मांसी कांहीं विशेषात्कारे न बोलावे. आणि आमचे कामाकाजा मनोभावे करीत जावे. नवेजुने कामकाज पडत जाईल. ते तुमचे जिम्था असो. सदरहू ऐवज शके १६११ पासून पाठवीत जाऊं. शके १६७० प्रभवनाम संवत्सेर. माहे पौश व॥ ११ सुरसन तीसा अर्बन मया अलफ माहे मोरेम छ २५ रोज हे विः

बार मोर्तब.

शिक्का.

नं. ५२ श्री आंबाबाई प्र॥ नक्कल

यादी निसबत चिटणीवीस सु॥ तीसा तिसैन मया अलफ कारकूनी माहालानी हाय व गांव गन्ना नेमणूक.

उत्तम

७५ पौ विजापूर
७५ पौ बागेवाडी
६० पौ गोठे
६० पो कासेगांव
३० को आटपाडी
३० को नाझर
५० पो मेवली
७५ पो विनाका
४० सरदेशमुखी प्रो कडेवलीत
४० बावती जालनपूर वगैरे
माहाल २७॥
१५ सोलापूर आहीरवाडी वगैरे
मोकासी गांव सु॥
१० इखडी बैरती बासुर
३० नाडगौडी परगणे मिरज
१० नाडगौडी परगणे सांगली
धनगर महाला

६००

मध्यम.

४० सुभाप्रांत वाई
४० सुभा प्रांत कराड
४० ता॥ कोळे वारुण
४० को वांगी व भाळवणी
५० सुभाप्रांत जाणुकिल्ले सुद्धां
२५ सुभा सातारा.
४० को निमसोड माटणी.
२५ को आऊंध
सुभात महितगड
१५ खानगी गांव प्रांत खटाव
४० सुभाप्रांत खटाव.
२५ तर्फ विरवाडी.
७५ तर्फ वसंतगड खाजगी सु॥
त॥ खासगी
त॥ किनई
४ मौजे भंडारा कोठे वनिमर गीस

४९५

कनिष्ट

४० ठाणे खानापूर
२५ त॥ कुडाळ मेढे
१५ तर्फ गुणवतगडत॥मरळी
फुटगांव

किल्ले

२० मछींद्रगड
१५ सदासिवगड
० व्याघगड
४० वर्धनगड
४० महिमानगड

१५ जवळ प्र॥ सागोले
१५ मौजे राजापूर प्रांत
१५ प्र॥बनवाडीमालाचा
पैकीं देहे.

४० हुजुर खानगीचे गांव नि॥
वामनराव
२५ खासगी गांव नि॥ मारो
अनंत
१५ नि॥ कृष्णराव जगन्नाथ
१० मौजे पाडळी व खरोड
नि॥ बाजी रघूनाथ
० मौजे बारगांव नि॥
भगवंतराव आपाजी
१० मौजे कडवई
१० मौजे पावस ता॥ रत्नागिरी
० मौजे कालगांव करंगुली
व धामणी
० मौजे सुली व टाकळे प्र॥वाई
० मौजे दिगंची
० मौजे दिगंची
० मौजे आठपाड

० मौजे पानीव
२५ प॥ येलापूर ठाणेमसूर
३० मौजे संतभोड रव्हीप॥
कालाळूर तिनाईबाबती
० बोरगांव येलापूर

२९५

नक्ती माहालानीहाय
प्रो कराड

० वारूगड
१५ भूषणगड
० मंगळगड

१३०

सरंजामी
५० राजाराम खंडेराव
३०० मुतालीक
१५० वाघ मारे

१५० पोळ
१५० निंबाळकर खमळूलकर
माळवणी
१५० घाडगे
मलवडी
बुध
५० मसवड माने
१० गुडदळ भाजेली
वाघमारे.
५० नादवळ हाडकर मौजे
[illegible]
० पवार मौजे चितळी
० मौजे वडमांव माधवराव
मुंढे.
४० आनंदराव महादेव
५० खुलकर को घिरडी
४० काटे
४० वकील खंडो कृष्ण
१० कोलढाणकर.

१०४०

दहाशेचाळीस.

11 JAN 1994
6 APR 1990

को विजापूर
प्रो गोठे
मायणी
वागी भाळवणी

७५

| | |
|---|---|
| ६०० | |
| ४९५ | |
| १९५ | |
| १३० | किल्लेहाय |
| १०४० | सरंजामी |
| ७५ | जकाती |
| २८३५ | |

येकूण नेमणूकी आठाविसशे पसतीस शिवाय पत्राची मिळेल ती इनाम पत्र व ताकीदपत्र वगैरे मिळून अजमासे जे मिळेल ते घ्यावे. येणें प्रमाणें येकूण सदरहू शऱ्याचे अनवये नेमणूकी आठाविसशें पसतीस शिवाय पत्र वगैरे मिळेल ती घ्यावी येणें प्रमाणें देणे.
छ १ मोहरम् मयातैन
जेष्ट मुकाम पुणें.

न. ५३ श्री नक्कल

गायकवाड प्रकर्ण

ही चिटी रावजी आपाजी
यांचे हातची

रावजीची विज्ञापना चिटणीशी दरक संबंधे तुर्त वर्षासन तीन हजार सेना खासखेल याजकडील दरसाल पावत जाईल. पुढे साईने सारे पावेल. हे विज्ञापना.
पौ छ २५ रजबसन आर्ब
ती सैनमयात आलफ

# ऐतिहासिक-जुने-लेख.

## पुस्तक १लें

### याजवरील अभिप्राय:—

(रामकृष्ण बळवंत चिटणीस, इनामदार वडगांव जि. सातारा)

श्रीम्हालसाकांतप्रसन्न सातारा

६।८।१५

सप्रेम कृतानेक सी. सा न. वि विशेष.

आपण **चिटणीस घराण्याचे संक्षिप्त माहिती**ची हस्तलिखित प्रत सातारा येथील लोकांचे माहितीकरितां पाठविलीत ती पोहचली व आपले तदनंतर आलेलें पत्रही पावले. येथील पुष्कळशा मंडळीनीं व मी स्वतः ती अतिशय प्रेमानें वांचली. सदरची माहिती आपण अतिशय परिश्रम करून मिळविलीत याजबद्दल बिलकूल संशय नाहीं. सदरची माहिती छापून काढून प्रसिद्ध करून आपण ज्ञातींतील लहान थोर मंडळोवर अतिशय उपकार करित आहां, ही गोष्ट कोणीहि केव्हांहि नाकबूल करणार नाहीं. हल्लींचा आपला प्रयत्न फार स्तुत्य असून इकडील ज्ञात्यभिमानी लोकांस फार आनंद वाटत असून सर्व लोक एकमतानें आपली प्रशंसा करीत आहेत. हल्लींचे प्रकारची कल्पना आपले मनांत प्रथमच येऊन आपण अंगिकृत केलेलें कार्यास पूर्ण पणें यशस्वी व्हावें, अशी सर्वत्रांची मनापासून उत्कट इच्छा आहे. आपल्या प्रती छापून तयार झाल्यानंतर इकडे कळविल्यास पुष्कळ गृहस्थ आत्मस्फूर्तीनें तिचा स्वीकार करतील अशी खात्री आहे. आपण हस्तलिखित प्रत इकडे पाटऊन आपले प्रयत्नाची दिशा आह्मांस कळविलीत, याजबद्दल मी आपला फार फार आभारी आहे. कळावे लोभाची वृद्धि होत असावी हे विनंती.

आ. हितेच्छु

रामकृष्ण बळवंत चिटणीस.

17 JAN 1996

**रायबहादूर बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.**

एफ्. झेड. एस् एम. आर. एस्. ए.

*Belvedere,*
*P. O. Alipore*
*Calcutta*
*4-11-15*

श्री

विनंति विशेष. आपलें कार्ड पोचलें व **चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती** या पुस्तकाची एक प्रत दाखल झाली.

**जुने ऐतिहासिक लेख** आपण प्रसिद्ध करीत अहां हें आपल्यास मोठें भूषण आहे. पूर्वापार कारकूनी धंदा करणाऱ्या जातींत आणखी एक कारकून बच्चा निर्माण झाला हें पाहून मनास फार आनंद होतो. आपल्या पुस्तकाला मोल नाहीं. हे अमोल्य लेख माझ्या दृष्टीस पडले हे मी आपलें मोठें भाग्य समजतों. आपल्यास यश प्राप्त व्हावे व आपण लिहून काढून प्रसिद्ध करीत असलेल्या ग्रंथांस आश्रय मिळावा अशी माझी परमेश्वराजवळ मागणी आहे. आजरोजीं मनिआर्डर पाठवित आहे तरी सदरहू पुस्तकाच्या ११ प्रती रा. रा. त्रिंबकराव वासुदेव गुप्ते, वकील, बुधवार पेट, पुणें, पत्यावर पाठविण्याची तजवीज करावी. लोभ असावा हे विनंति.

आपला.

**बाळकृष्ण अत्माराम गुप्ते, साष्टीकर**

---

**विविधज्ञान विस्तार** आणि **महाराष्ट्र-साहित्य पत्रिका.**

नोव्हेंबर १९१५ अंक ११

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रें** रा. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी, यांनीं सुरू केलेल्या 'ऐतिहासिक जुने लेख' मालेचें हें प्रथम पुस्तक आहे. पृष्ठें ४० किं ४ आणे. शिवाजीमहाराजांच्या अष्टप्रधानांपैकीं जे चिटणीस त्यांच्या घराण्याची ही हकीगत प्रत्येक इतिहास भक्तास प्रिय आणि संग्राहार्ह वाटेल. या लेखमालेंत कायस्थप्रभूंच्या इतिहासाची साधनेंच देण्याचा विचार दिसतो. जुन्या ऐतिहासिक लेखांच्या प्रसिद्धी करण्याची ही वांटणी वाईट नाहीं.

## ज्ञानप्रकाश ता. २ डिसेंबर १९१५

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहितीः**— हें चिमुकलें पुस्तक रा. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी, मुंबई, यांनीं प्रसिद्ध केलें असून त्यांत चिटणीस घराण्याची कांहीं माहिती व सनदापत्रें दिलीं आहेत. मराठ्यांच्या अमदानींतील इतिहास बखरीच्या रूपानें लिहून ठेवून या घराण्यानें महाराष्ट्रावर मोठे उपकार करून ठेविले आहेत एवढेच नव्हे तर कायस्थप्रभु ज्ञातींतील कित्येक पुरुषांनीं राज्यसंस्थापनेच्या कामीं छत्रपतीस केवढी मदत केली ही गोष्ट सर्वांस महाशूरच आहे. तेव्हां या घराण्याच्या इतिहासानें महाराष्ट्र वाङमयास विशेष शोभा येणार आहे हें उघड आहे. या दृष्टीनें रा. कुळकर्णी यांनीं आपल्या पूर्वजांची व पर्यायानें सर्व महाराष्ट्राची जी सेवा चालविली आहे ती निःसंशय अभिनंदनीय आहे निरनिराळ्या घरांण्या संबंधानें असें प्रयत्न झाल्यास इतिहाससंशोधक मंडळांचे काम बरेंच सुकर झाल्या वांचून रहाणार नाहीं. पुस्तकाची किंमत ४ आणे आहे.

---

## संदेश ता. २६ डिसेंबर सन १९१५

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती** (संपादक बा स. कुळकर्णी) मराठेशाहींत मर्दुमकी व मुत्सद्देगिरी गाजविलेल्या चिटणीस घराण्यांतील देशभक्ताची संक्षिप्त परंतु साधार माहिती या पुस्तांत दिली आहे. शिवाय सनदापत्रांचाही संग्रह केला आहे सर्व इतिहासभक्तांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें.

---

## आनंद जानेवारी १९१६

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रें** "ऐतिहासिक जुने लेख" या मालेंतलें हें पहिलें पुस्तक असून यांत श्री शिवाजी महाराजांचे सुप्रसिद्ध चिटणीस बाळाजी आवजी यांच्या घराण्याची माहिती अस्सल कागद पत्रांच्या रूपानें दिली आहे. इतिहासदृष्ट्या हें लहानसें पुस्तक बरेंच महत्वाचें आहे. अशीं पुस्तकें स्वल्प किंमतीस देण्याची कांहीं तरी तजवीज अवश्य व्हावयास पाहिजे.

बीर

**धर्मजागृति** फेब्रुवारी १९१६

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती-ऐतिहासिक-जुने-लेख:**— पुस्तक १ लें किंमत ४ आणे (प्रकाशक-बळकृष्ण सखाराम कुळकर्णी, बनामहॉल लेन, मुंबई.) या पुस्तकामध्यें इतिहासप्रसिद्ध चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती आणि सनदपत्रें हीं दिलीं आहेत. महाराष्ट्रांत राज्यसंस्थापना आणि त्यांचें रक्षण या कामीं **बाळाजी आवजी** आणि **खंडो बल्लाळ** या दोघांनीं जी अपूर्व कामगिरी केली त्या संबंधानें ह्या लहानशा पुस्तकांत विश्वसनीय अशी माहिती आली आहे. ही माहिती इतिहासप्रिय वाचकांस उपयुक्त व मनोरंजक वाटेल यांत कांहीं शंका नाहीं. रा. कुळकर्णी यांचा इतिहास साधनें प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. आणि या प्रयत्नास इतिहास जिज्ञासूंकडून योग्य ती मदत होईल अशी आह्मांस आशा आहे.

---

**भारतसेवक** फेब्रुवारी १९१६

ऐतिहासिक जुने लेख पुस्तक १ लें. **चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रें:**— लेखक-श्री. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी, किंमत ४ आणे. चिटणीस घराण्यानें मराठ्यांच्या इतिहासांत व इतिहासलेखनांत केलेली कामगिरी सुप्रसिद्ध आहे. सुप्रसिद्ध कवि कै. मल्हार खंडेराव चिटणीस हे ह्या घराण्यांतलेच होत. यावरून कांहीं घराणीं वंशपरंपरेच्या तत्वानुसार (Heredity) कशी पुन्हा: पुन्हा: उदयास येतात, हें चांगलें दिसतें. ह्या लहानशा पुस्तकांत चिटणीस घराण्याची थोडक्यांत माहिती दिली असून, तें इतिहास संशोधकास उपयोगी पडेल.

---

**मधुकर** जुलै १९१६

**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रें:**— लेखक बी. एस. कुळकर्णी. महाराष्ट्राचे इतिहासाचे दृष्टीनें अशातऱ्हेची सनदापत्रें प्रसिद्ध होणें अत्यंत इष्ट आहे. बाळाजी आवजी, खंडोबल्लाळादि चिटणीस मंडळी इतिहास प्रसिद्धच आहे. त्याच घराण्याची माहिती उपलब्ध करणारी सनदापत्रें छापली आहेत. इतिहास भक्तांनीं या पुस्तकाला अवश्य आश्रय देऊन ग्रंथकरास उत्तेजन द्यावें.

---

श्री सा. गं. प.
वाचनालय, भोर
15 JAN

## तापाच्या भयंकर रोगापासून सावध रहाण्याकरितां

## कर्णिक्स मिक्श्चर

मुद्दाम संग्रहीं ठेवा व वापरा.

किं. ८१० आणे. मोठी बाटली किं. १ रुपया.

ट. ख. निराळा.

कर्णिक ब्रदर्स.---५६/३ गिरगांव, मुंबई.

---

# The Chandraseniya Kayastha Prabhu Co-operative Credit Society Ltd.

*Registered on 21st October 1915 under Act II of 1912.*

Total Number of Shares 1000 of the nominal value of Rs. 15 each.
Number of shares sold 550.
Loans advanced to date to the Members Rs. 37,750.
Deposits on hand Rs. 27000
Number of Members 419.
Last dividend declared at 6%
Open for the Members of the Chandraseniya Kayastha Prabhu Community of the Bombay Presidency excluding Native States.

VISHRAM BUILDING,
*Sandhurst Road, Bombay No. 4.*

## विक्रीस तयार ! विक्रीस तयार !! विक्रीस तयार !!!

ऐतिहासिक-जुने-लेख-पुस्तक १ लें. चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रें. या पुस्तकावर उत्तम अभिप्राय आले आहेत. प्रति थोड्याच शिल्लक आहेत. किं. ४ आणे. ट. ह. निराळी.

---

ऐतिहासिक-जुने-लेख पुस्तक २ रें लौकरच प्रसिद्ध होईल.

बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.

---

## मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष

**ले. राम नारायण.**

ह्या ग्रंथामध्यें राष्ट्राच्या उन्नति-अवनति व त्यामध्यें होणाऱ्या नानाविध घडामोडी संबंधानें शास्त्रीय भविष्यें कशीं करावीं याचें विवेचन केलें आहे. मराठी फल ज्योतिष वाङमयामध्यें हा ग्रंथ अपूर्व आहे. ज्योतिर्मालेच्या वर्गणीदारांस किंमत ८८ इतरांस किं ८१२ आणे ट. ख. निराळा.

ज्योतिर्माला:— फलज्योतिष शास्त्रासंबंधानें सशास्त्र उहापोह करणारें हें मासिक पुस्तक दरमहिन्यास नियमित वेळीं प्रसिद्ध होतें. ह्या मासिकांत भारतीय व युरोपीय फलज्योतिषासंबंधानें चर्चात्मक लेख, नानाविध योगांच्या कुंडल्यांचा संग्रह आणि ज्योतिष शास्त्राच्या निरनिराळ्या शाखासंबंधानें मार्मिक व उपयुक्त लेख येत असतात वार्षिक वर्गणी ट. ख. सह अवघी रु. १॥ वर्षारंभ एप्रिल पासून. (१) **बालबोध ज्योतिष** किं. ८६ (२) **विवाह प्रदिप** किं. ८८ (३) **चिटणीस कृत पुस्तकांचा लाट**—जुनीज्योतिर्माला वर्ष २ दुसरें **ग्रहसाधन व भावसाधन** वगैरे वरील पुस्तकें वरील **मालेच्या** वर्गणीदारांस कमी किमतीस देण्यांत येतील.

पत्ता:— **म्यानेजर ज्योतिर्माला ऑफिस, दादर, मुंबई नं. १४.**

---

**भावीक स्त्री-पुरुषांस अमूल्य संधी !**

## श्री तुलसी महात्म्य.

**संपूर्ण १५ अध्यायी**

ग्लेझ कागदावर जाड्या मोठ्या टाइपांत छापलेले सुंदर कापडी बाइंडींग

**किंमत १२ आणे. ट ख. निराळा.**

एकदम ५ प्रती घेणारास टपाल खर्च माफ **व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.**

**प्रोग्रेसिव प्रिंटिंग वर्कस्,**

मोतीलाल बिल्डींग नं. २, खेतवाडी मेनरोड, गिरगांव, मुंबई

---

Printed by Y. N. Tipnis at Progressive Printing Works, Motilal Building No. 2, Khetwadi Main Road, Girgaum, Bombay, and published by B. S. Kulkarni at Krishnabai Building, Benam Hall Lane, Girgaon, Bombay.